... वर्गणीचा किंमत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्षाची | अगाऊ रु० ५ | डांक हाशील | | ०|१२ |
| सहामाही | " ३ | " | | ०|८ |
| सालअखेर | " ७ | " | | १|०|८ |
| किरकोळ अंकास | ........................ | | | ०|४ |

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०|०|६
दुसरे खेपेस ........०|१

| | Rs. | | | |
|---|---|---|---|---|
| annum in advance | 5 | Postage | 13 | as |
| annum in arrears | 7 | ,,1Rs | 8 | as |
| Six monthly............ | 3 | " | 8 | as |
| Single copy............................................ | | | | 4as |

Advertisements
Below 10 lines...2 as
per line over10...4 as
Repetition per line3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VO XXVI | AKOLA MONDAY 7 MARCH 1892 | NO 10

वर्ष २६ | अकोला सोमवार तारीख ७ माहे मार्च सन १८९२ इ० | अंक १०



जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाट रहाऊसचा, स्टेशन धर्मशाळेचा, बाजार कर वसूल करण्याचा, कंदील लावण्याचा वगैरे मक्त्यांचा सन १८९२।९३ सालाकरितां हरास तारीख १७ माहे मार्च सन १८९२ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांणीं सदरहू तारखेस हजर राहण्याचें करावें कळावें तारीख १२ माहे फेब्रुवारी १८९२ इसवी.

Vyankatesh R. Mudholkar.
Secretary.
A. M. C.


वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध ९ शके १८१३

उमरावती येथील शिमगा पुष्कळ दिवसां पासून प्रसिद्ध होता हें सर्वांस माहीत आहेच. तेथें मारवाडी आणि परदेशी लोकांची पुष्कळ वस्ती असल्या कारणानें त्या लोकांत या सणा निमित्त बरेंच अचकट विचकट वर्तन होत असे. त्याच प्रमाणें त्यावेळचे ब्राह्मण व ब्राम्हणेतर मंडळी यांचेंही या सणावर मोठें प्रेम होतें. त्या वेळीं फाल्गुन मासांतील दैवत्याच्या शांत्यर्थ सार्वजनिक वर्गणी होऊन तो सण बहुतेक सर्व सरकारी नोकर आणि वकील इत्यादि सर्व पुढारी मंडळी मिळून मोठ्या आनंदानें साजरा करीत असत. त्या वेळचे कांहीं रंगेल लोक परलोकवासी झाल्यापासून ब्राह्मण व इतर पांढरपेशा मंडळींतील या सणाचें बंड बहुतेक मोडल्या सारखें झालें आहे. आठ दहा वर्षांपूर्वीं पर्यंत मारवाडी लोक धनराज आळींत एका नथुरामाचा अगडबंब नग्न पुतळा तयार करीत असत आणि त्या रस्त्यावरून कोणी स्त्रिया जाऊं येऊं लागल्या ह्मणजे तेथें अतिशय नीच प्रकारचा जो अचकट विचकटपणा होत असे. तो त्यावेळचे तेथील पोलिस सुपरिंटेंडेन्ट मि० व्हिकाजी यांनीं अगदीं बंद केला आणि तेव्हांपासून आजपर्यंत धनराज ओळींत नाथुरामाचा पुतळा दर वर्षीं तयार होत असतो तथापि त्यांत कोणचा ही बिभत्स प्रकार नसतो. ह्मणजे हे विशाळ देंदे नाथुराम शेटजी हल्लीं वस्त्रावर्णानें आच्छादलेले असतात. यंदाचे सालीं जुन्या व नव्या मताच्या मंडळीपैकीं बऱ्याच प्रमुख लोकांनीं तेथील डेपुटी कमि. साहेब यांचे कडे असा अर्ज केला कीं हमरस्त्यावर आणि इतर प्रसिद्ध ठिकाणीं दुसऱ्याला त्रास होईल या तऱ्हेनें कोणी बीभत्स शद्ब उच्चारील किंवा बीभत्स गाणें गाईल तर त्याला कायद्या प्रमाणें शिक्षा होईल अशा मजकुराची दवंडी द्यावी. त्या अर्जा प्रमाणें मे० डे० कमि० कर्नल गनथार्प साहेब यांनीं गांवामध्यें दवंड्या दिल्या आहेत हें कळविण्यास आह्मांस आनंद वाटतो. ह्या बाष्कळपणाच्या सणामध्यें आह्मा सुधारलेल्या हिंदुलोकांत अद्याप पर्यंत जें गैरशिस्त वर्तन होतें तें आपल्या हातून न होऊं देण्याविषयीं आणि इतर लोकांकडून होत असल्यास तें बंद करण्या विषयीं प्रयत्न करणें हें प्रत्येक समंजस मनुष्याचें कर्तव्य आहे. व त्याप्रमाणें आमच्या उमरावतीकर प्रमुख मंडळींनीं या कामांत जी खटपट केली ती अगदीं योग्य प्रसंगीं केली यांत संशय नाहीं. प्रसिद्ध ठिकाणीं दुसऱ्याला त्रास होण्या सारखें बिभित्स प्रकारचें भाषण करणें आणि बिभत्स प्रकारचीं गाणीं गाणें यांची कायद्यानें मनाई केली आहे आणि अशा प्रकारचा अपराध करणारास कायद्यानें शिक्षा ठरवलेली आहे.

याचवेळीं आह्मांस हें लिहिलें पाहिजे कीं आह्मां आकोलेकरांचें पूर्वीं पासून या सणाचे निमित्तानें कधींही ह्मणण्यासारखें निंद्य वर्तन झालें नाहीं ही गोष्ट त्यांना मोठी भूषणास्पद आहे.

---

येत्या एप्रिल महिन्याच्या आरंभीं लेडी लान्सडौअन या विलायतेच्या आगबोटींत बसण्यासाठीं मुंबईस जाणार आहेत आणि त्यांना पोंचविण्या साठीं व्हाइसराय साहेब खुद्द मुंबईला येतील. तेव्हां मुंबईस-मुनसिपालिटी तान्सा तलावाचें पाणी सर्व शहराला सोडण्याचा मोठा समारंभ बड्या पाहुण्याच्या हातून करविणार आहे. व्हाइसराय साहेबांच्या भेटीचा लाभ अशा महा कार्याच्या मंगल आरंभानें लोकांच्या मनांत पक्केपणीं चिरस्थाई होईल आणि महाराणी सरकारच्या प्रतिनिधीचा बहुमान होऊन शिष्टगमना निमित्त सहजीं महोत्सव ही होईल. वरील महोत्सवा प्रीत्यर्थ किती सहस्त्र रुपये खर्चीं घालावे या प्रश्ना संबंधानें मुंबईच्या मुनसिपल कारपोरेशन मंडळीं मध्यें मतभेद पडला आहे. कांहीं ह्मणतात कीं पन्नास हजार रु. खर्चल्या शिवाय हा प्रसंग साजरा व्हावयाचा नाहीं. पंचवीस हजार रकम फार नसून बेताची आहे असें दुसरे ह्मणतात. पंधरा हजार किंवा दहाहजार रुपयाहून खर्च वाढूं देऊं नये असाही कांहीं जणाचा अभिप्राय पडतो व्हाइसराय साहेबांचे आदरातिथ्या साठीं पाहुणचार सर्वोत्कृष्ट झाला पाहिजे ही प्रेमबुद्धी व राजनिष्ठा अभिनंदनीय आहे तरी सहस्त्रावधि रुपये ऐष आरामाच्या व चैनीच्या अल्पकालीन मजालसी साठीं उधळावे हें आह्मास अगदीं अप्रशस्त वाटतें. नजिक नजिकच्या प्रांतांतून दुष्काळांतली अन्नाची महर्गता व पाण्याची टंचाई यामुळें प्रजाजन हवालदील होऊन गेले आहेत अशा समयीं व्हाइसराय साहेबांच्या नांवानें दुष्काळ फंड उभारावा आणि समारंभ अगदीं स्वल्प खर्चानें उरकून घ्यावा हें बरें. परंतु हा विचार कोणास सुचला नसेल असें नाहीं. परंतु बारिष्टानें व खऱ्या पक्षाच्या अभिमानानें आपलें मत स्थापित करण्यास पुढें बजावतो कोण?

---

निजाम सरकारचे दिवाण सर अस्मान जहा यांची स्वारी उत्तर हिंदुस्थानांतून परत हैदराबादेस दाखल होऊन बरेंच दिवस झाले तरी रायचूर मुक्कामीं त्यांना मानपत्र देण्यांत आलें त्यावर उत्तर देतांना ते जें बोलले त्याचें मनन केलें ह्मणजे नेटिव राज्यांत दुष्काळा निमित्त किती दक्षतेनें व्यवस्था चालली असते तें हीं लक्ष्यांत येईल. ते ह्मणाले कीं दुष्काळानें पीडलेल्या लोकांसाठीं निरनिराळीं कामें उभारलीं आहेत, गरीब लोकांविषयीं खुद्द निजाम सरकार फार दिलगीर असून त्यांनीं अनेक उपाय योजिले आहेत त्यामध्यें अशक्त, दुबळ्या, पंगु अशा लोकांच्या प्राण संरक्षणासाठीं अन्नछत्रा सारख्या व्यवस्था करण्यासाठीं हुकूम दिले आहेत आणि गरीब लोकांकरितां विश्राम गृहें अद्याप नको आहेत तरी दुष्काळा संबंधानें हैदराबाद दरबारची कडेकोट तयारी चालली आहे.

---

वऱ्हाडांतील जंगलखातें वऱ्हाड प्रांता पुरतें निराळें स्वतंत्र नाहीं. मध्यप्रांत, वऱ्हाड आणि कुर्ग मिळून जंगलखात्यासंबंधानें एक इलाखा आहे आणि या इलाख्याच्या पोटविभागांत वऱ्हाडाचा समावेश होतो. वऱ्हाडासाठीं वरिष्ठ प्रतीचे जंगल खात्याकडील अधिकारी ह्मणजे एक कान्सरव्हेटर, तीन डेप्युटी आणि असिस्टंट कानसरव्हेटर आणि सहा सब असिस्टंट कानसरव्हेटर्स मिळून दहाजण आहेत. जंगलखात्याच्या व्यवस्थे निमित्त वऱ्हाड–जंगल–कायदा ह्मणून निराळा कायदा अंमलबजावणींत चालूं सालीं येत आहे आणि विशेष सक्तीचे नियम व जंगलाचा विशेष फैलाव हे उत्तरोत्तर अधीक होत चालले आहेत, लोकांस ही आणि मुख्यत्वेंकरून शेतकरी रयतेस जनावरांस चारण्या साठीं मोकळीं जंगलें पाहिजेत अशी जरूरी व अवश्यकता फार वाटूं लागली आहे अशा प्रसंगीं जंगलखात्याची माहिती वारंवार कळवून काय काय गोष्टी साठीं सरकार सरकार जवळ दाद मागितली पाहिजे व जंगलखात्याची वाढ व भरभराटी कोणत्या धोरणावर करण्या विषयीं सरकारास भाग केलें पाहिजे हें थोडें बहुत सांगण्याचा आमचा मानस आहे.

सांप्रत सरकारनें जंगलखात्या संबंधानें सुधारणा चालविली आहे तींत प्रजेच्या कल्याणाकडे दृष्टी नसून सरकारी अमलदारांचे वर्ग, दर्जे, व त्यांचे पगार इत्यादि नियमित प्रमाणावर वाढवून सर्व प्रकारें या अधिकारी समुदायाच्या खर्चाचा जंगलखात्या वरील बोजा फार जबरदस्त केला आहे. हा खर्चाचा दरवाजा अशा युक्तीनें खुला केला आहे कीं त्या खात्यांत नेटीवा पैकीं हुशार, होतकरूं, विद्वान्, बुद्धिमान अशा लोकांचा प्रवेश होऊं न देतां युरोपियन लोकांसाठीं निराळी कुबेरनगरी किंवा विलास मंदिर स्थापलें आहे.

कानसरव्हेटर, डेप्युटी कानसरव्हेटर आणि असिस्टंट कानसरव्हेटर या तीन दर्ज्यांचे अधिकारी पहिल्या प्रतीच्या अधिकाऱ्यांत मोडतात आणि त्यांचे पगार १६०० रुपया पासून ३०० पर्यंत असतात. सब असि. कानसरव्हेटर व त्यांच्या हाताखालील लोक हे दुसऱ्या प्रतीच्या अधिकाऱ्यांत मोडतात. या पहिल्या व दुसऱ्या प्रतींत नेटिव लोक हे फार करून नसतात. डेहराडून आणि पुणें सायन्स कालेज येथील विद्यालयांतून फारेस्ट कडील शिक्षण मिळालेल्या विद्यार्थ्यांस सब असिस्टंट कानसरव्हेटरच्या दर्ज्यांत दोन तीन वर्षांच्या उमेदवारी नंतर नेमण्याचा सरकारचा विचार आहे. परंतु पहिल्या वर्गांत नेटिवांस तिळांजली दिली आहेच आणि दुसऱ्या वर्गांत ही मोठ्या भिन्नतवारीनें नेटिवाची नेमणूक झाली ह्मणजे एखादी शर्यत जिंकली समजावयाची. अशी शोचनीय स्थिति सध्यां आहे तर सरकारपाशीं नम्रतेनें मागणी करून जंगलखात्यांत नेटिवांची भरती जेवढी तितकी नेली पाहिजे.

वऱ्हाड प्रांतांतील जंगल खात्या कडे एकंदर ४२८४ चौरस मैल जमीन आहे म्हणजे सर्व प्रांताच्या क्षेत्रफळाच्या मानानें एक चतुर्थांश जवळ जवळ स्टेट फारेस्ट, बंदी जंगल, व बिन लागवडीचे पडीत जंगल मिळून जमीन जंगलखात्याच्या ताब्यात आहे. स्टेट फारेस्टांत जनावरांस चारण्याची परवानगी नाहीं. फक्त बुलढाणें जिल्ह्यांत कुरणें नसल्यामुळें परवानगी देत असतात. आमच्या मतें दिवसेंदिवस सर्व प्रांतांतील लोकांस गवतचारा फार दुर्मिळ व महाग असल्यामुळें आपापल्या घरची गुरें पोसणें फार अवघड झालें आहे. शेतांतील कडबा व कुटार यांवर वर्षभर गुरांचा निर्वाह चालत नाहीं. कुरणांची जंगलें बंदिस्त आहेत आणि वनचराई खर्च केली तरी सर्वच जंगलांतून परवानगी नसते. ह्मणून लोकांची मोठी त्रेधा उडते. शिवाय जळाऊ लांकडे दिवसेंदिवस फार महाग दरानें विकली जातात. जंगलांतील लांकूड फांटा तोडून न देण्या विषयीं सरकारी कायदे कानू कडक प्रकारचे व सक्त मनाईचे आहेत त्या

मुळें रयतेला अत्यंत पीडा व जांच होतो. बंदी जंगलांतील सर्पणाच्या व इमारतीच्या लांकडावर सरकारी निरखाचे कर भारी ठरविले आहेत. सरकारच्या कडेकोट बंदोबस्तानें नाडलेला व गरज असल्यामुळें नडलेला मनुष्य सरकारी जंगलखात्यांतून जवळ्या सवलती व फायदे मिळतील तितक्याच साठीं सरकारचे पाय धरीत असतो आणि सरकार तर आपल्या गरजाकडे व आपल्या उणिवांकडे दुर्लक्ष करितें. ही मोठी इंग्रजी राज्याला कमीपणाची गोष्ट होय.

वऱ्हाडच्या जंगलखात्याचें सन १८९०-९१ सालचें उत्पन्न सागवान, जळाऊ लकडी, कोळसा, वेळू, बनचराई, गवत व इतर किरकोळ यां मिळून ४,८७,१०९ रुपये आहे आणि यातून त्या सालाबद्दल खर्च रुपये १,६८,६०८ वजा जातां बाकी निव्वळ नफ्याचें उत्पन्न ३,१८,५०१ रुपये आहे. सन १८८९-९० सालीं नफ्याचें उत्पन्न २६३,९९१ रुपये होतें ह्मणजे एका वर्षांत ५४,५१० रुपये उत्पन्न वाढलें आहे. सरकारची स्वार्थावर दृष्टी फार आहे. व्यापारी वळण अंगीं खिळलें असल्यामुळें मुळें प्रजेचें हिताहिता कडे पूर्ण लक्ष्य पोंचत नाहीं. लोकांना जंगलखात्या पासून काय काय गोष्टी मिळणें अवश्य आहे याचा विचार करून सरकारनें त्या खात्याची व्यवस्था कोणत्या धोरणावर किंवा तत्वाला अनुसरून ठेविली आहे या बद्दल निश्चयानें कांहींच सांगवत नाहीं.

---

व्हालंटीअर लष्करच्या मंडळीचे एक कमिशन बसलें होतें त्या कमिशनानें पुष्कळ आपल्या सवलतीच्या व सोयीच्या सूचना केल्या आहेत. आपखुशीनें शिपाईगिरीचें काम शिकण्याची लोकांस हौस वाटावी आणि त्यांचें मन व्हालंटीअर पलटणींत शिरण्या कडे वळावें म्हणून कमिशननें अनेक उपाय सूचविले आहेत परंतु त्यांतील मूल तत्व चुकीचें असल्या मुळें त्या सूचना वरिष्ट सरकारास पसंत पडणार नाहींत अशी आमची पूर्ण खातरी आहे. नेटीव लोकांना हत्याराचा कायदा लागू आहे आणि त्यांना व्हालंटीअर होण्याची परवानगी नाहीं तेव्हां आमच्या लोकांचें कमिशनच्या म्हणण्या कडे लक्ष्य जाण्याचें कारण नव्हतें परंतु तें म्हणणें सरकारनें कबूल केलें तर हिंदुस्थानच्या खजिन्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीनें बूड लागणार आहे म्हणून आम्हाला त्या कमिशनच्या सूचना विषयीं दक्षतेनें आणि वेळेवर आक्षेप घेतले पाहिजेत. व्हालंटीअर पलटणींतल्या शिपायास इनकमट्याक्स असू नये, त्याच्या मुलांबाळांस फुकट शिक्षण मिळावें, पेनशनच्या नोकरीची मुदत कमी असावी, रेल्वेचे व आगबोटीचे फुकट पास मिळावे इत्यादि सूचना कमिशननें केल्या आहेत आणि त्या कित्येक इंग्रजी पत्रकारांस ही मान्य नाहींत ही गोष्ट स्मरणांत ठेविली पाहिजे. इंग्रजी पत्रकाराप्रमाणें जनरल ब्राकनबरी मिलिटरी सेक्रेटरी यांस ही कमिशनचे विचार पसंत नाहींत. ज्याला कायद्यानें आपखुशीनें शिपाईगिरी पतकरता येते अशा प्रत्येकानें व्हालंटीअर पलटणींत शिरलेंच पाहिजे असा सक्तीचा नियम असावा ह्मणून एक सूचना आहे. त्यावर ते ह्मणाले कीं आपखुशीचा शिपाईबाणा प्रत्येकानें सक्तीनें मान्य करावा असें बोलण्यांत जमीन अस्माना इतकें परस्परविरोधी अंतर दिसतें. आपखुशीनें शिपाई कोणी बनला तर त्यांजवर सक्ति होतां कामा नये. सक्ती केली तर तो आपखुशीनें नोकरी बजाविल असें कधीं घडणार नाहीं. आपखुशीनें पलटणींत राहणार नाहीं त्याला अखेरची शिक्षा ह्मणजे शिपाईगिरीवरून दूर करितां येईल आणि या शिक्षेनें सक्तीचा नियम पाळला न जातां उलटा मोडला मात्र जाईल. इतर सवलती व सोयी मागितल्या आहेत त्या व्यक्तिमात्राला दिल्या ह्मणजे सरकारचा त्यांजवर हुकूम चालला पाहिजे. सरकारचे चाकरीला हे लोक बांधले गेले कांकीं त्यांना वेतना सारखा दुसरा मोबदला मिळत आहे देशाभिमानानें उदार बुद्धीनें स्वैरसेवक बनण्याचा मान केवढा मोठा आहे आणि त्याच्या अतुल मातबरीचा महिमा सरकारी पैसा कोणत्याही रूपानें उचलल्यानें कमी होतो. सरकारी पैसा ह्मणजे प्रजेचा पैसा होय. आणि इतर प्रजाजनाप्रमाणेंच व्हालंटीअर पलटणींतले लोक आहेत. तेव्हां त्यांना अधिक सवडी व फायदा मिळाला ह्मणजे त्यांच्या स्वैरसेवेचें काय मोल राहिलें? तेव्हां अशा हीनदर्शक व अमान्यतेचे द्योतक फायदे न मागावे हा शहाणपणा होय. इतर प्रजाजनाच्या बरोबर फायदे व तोटे सोसून स्वराष्ट्रसेवा करावी तेव्हां ती वास्तविक आपखुशीची मोफत चाकरी होय. परंतु या मोफत चाकरी साठीं म्हणून मात्र लोकाना पैशाच्या बाजूनें तोशीस पडूं नये हें ही मुख्य तत्व पाळलें पाहिजे. या तत्वाचें उद्घाटण करितांना जनरल ब्राकनबरी साहेबांनीं पलटणीच्या कवायतीचा खर्च, लष्करा प्रीत्यर्थ लागणाऱ्या सामानाचा खर्च वगैरे सरकारातून दिले जावे असें सांगितलें शेवटीं हिंदुस्थान सरकारच्या खजिन्यांत मोठी तूट आहे, जमे पेक्षां खर्चाच्या बाबी अधीक आहेत, सध्यां दुष्काळा सारख्या अचिंतित कारणा मुळें सरकार मोठ्या फिकीरींत आहे अशा समयीं खरी आपखुशीची राष्ट्रसेवा म्हटली म्हणजे व्हालंटीअर पलटणींतल्या लोकांनीं प्राप्त काळावर दृष्टी देऊन आपल्या गैरवाजवी व कमीपणाच्या तरी मागण्या बाजूस टाकाव्या हें कमिशनचें काम होतें परंतु आपलपोटेपणा व कदर्युपणा या पुढें चांगल्या गोष्टी सूचणें फार कठीण आहे.

---

स्वैर सेवकांच्या पलटणी बद्दल सरकारची दक्षता व पैरवी मोठी आहे परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, नेटीव लोक फुकट नुसती व्हालंटीअर पलटणीची परवानगी मागतात तर सरकारास मोठें वैषम्य वाटतें. हत्याराचा जुलमी कायदा बंद करण्याचें ध्यानींमनीं देखील येत नाहीं. तेव्हां व्हालंटीअरची परवानगी देऊन लोक लढवय्ये निघतील अशी योजना होईल अशी बिलकूल आशा नको. संशयखोर सरकार पराकाष्टेचें भित्रें आहे. नेटीव लोक बंडें करतील ह्मणून परवानगी देण्यास सरकार व्यत्यय आणतें. मग नेटिव लोक राजनिष्ट, विश्वासूक, व निस्सीम राजभक्त असे पोंकळ शेरे सर्व सार्वजनिक छत्यांच्या प्रसंगीं देण्यांत काय हांशील आहे? बोलण्यांत व वर्तण्यांत सरकारच्या एवढा फरक दिसतो त्याचें कारण नेटीव लोक अक्कलमंद, गैरशहाणपणाचे व नामर्द असल्या मुळें ते व्हालंटीअर पलटणीच्या परवानगीचा दुरुपयोग करतील असें असेल. परंतु हें कारण आज इतक्या दिवसांच्या साहचर्यानें व नेटिवांच्या प्रामाणिकपणानें व इमानें इतबारें सरकारची सेवा केल्यानें दूर झालें नाहीं किंवा त्याचें निश्चयात्मकपणें निराकरण झालें नाहीं तर आमचें प्रालब्ध आमच्या आडवें येतें असें मानणें भाग आहे

---

### OURSELVES.

We request our subscribers will allow us the usual Shimga Holidays which they have hitherto done ungrudgingly As our office will be closed for the holidays, there will be no paper issued next week.

The Berar Samachar

MONDAY, MARCH 7, 1892

## EDUCATION A SUBSTITUTE FOR THE DEPARTMENT OF POLICE.

We know we are conveying no new truth to our readers when we say education is delectable to morality in a variety of ways. In its influence on character it refines and softens it. It provides a remedy for all the morbid states of mind. It mitigates the fear of death and poverty. It is a pleasure that never palls. A man is soon tired of the pleasures of the senses. But it has not been recorded of any intellectual pleasure that it has ever cloyed any soul with its satiety and created in it a weariness of intellect. No doubt these are all trite truths. But they are all pertinent to our theme. We have repeatedly invited the attention of our benign Govt. to the necessity of recruiting the Police force with educated men whose supply is now fast increasing. We have with equal scrupulousness from time to time implored our government to make the education of the masses their paramount idea and their watch-word.

If we go to the root of any crime and examine the motives which perpetrated it poverty in most and brutal appetites in the minor rest will make up the whole complete. As a society advances it is but natural that wealth should be most unequally distributed. The magic of private property is a charm which advances society by stimulating each individual unit to work for himself in the most productive manner possible. No socialism nor communism would stand in a society that wants to progress. But society must progress. Poverty must exist. How to remove it? We can not remove poverty but we can mitigate its baneful effects by opening the eyes of the masses to the facts which must exist in any state of things. We can disseminate contentment in them. We can show them that poverty is no crime and that it is on the other hand most compatible with virtue. How can it be done? No ghost will be required to answer this. There will be but one opinion on this subject. Educate the masses and get rid of the baneful effects of poverty. The motives to crime though minor in themselves and distinct from poverty often appeal to the very core of the heart and operate very powerfully on it. But what things can better refine the mind than education?

The subject has been very often conclusively settled. The grounds of the people of Bengal for regenerating the Department of Police were principally based on these thoughts. If educated Police officers so necessary to the personal safety and security of property for every village only but rightly understood their business how much will they in coojunction with the school master contribute to banish crime from the precincts of their villages and confine it to mere beasts? Ultimately if people were rightly educated several petty crimes due to intemperance and other vulgar enjoyments in which no educated man will ever indulge will be entirely got over. In short the Government will be considerably freed from the burden of maintaining a police force at public expense. The twofold loss of the masses whose interest is never hostile to that of the Government will be saved.

These observations have forced them selves on us by the example of the organisation of the Police Force of Bombay Presidency and not that of the Island of Bombay itself. The work of this organisation was begun by the late Col. Wise whom every Hindu of right understanding will ever admire, continued by Mr. Ommanney whose name is immortal among Hindus in connection with his unflinching endeavours to keep the pledge of the Govt so solemnly given to the Mamledars involved in the late Crawford Commission, and completed by Col. J. Humfrey a man noted for his power to appreciate and reward merit wherever and in whatever rank it is found. His Head Clerk too is a very honest straightforward and venerable gentleman. He has been just raised to that post. Chances are that the Department would be soon most efficiently organised as the new system of the examination tests both University and Departmental to ensure the newly created lucrative graded salaries would bring in angels where fools now tread. The Departments are generally considered to be the Departments of "Fools where angels fear to tread."

If Col. Humfrey sets aside the vulgar principle of seniority alone and bears in mind that an educated man of mean experience will outshoot an illiterate man of long experience in his own bow, he will soon be called a second Col. Wise or Father of the Department of Police for Bombay Presidency. Moreover if seniority of service were the only qualification for best places Colleges and Educational Departments must be at once closed.

With this request to all officers at the head of the Police Administration we would give truce to our subject.

---

The Poona Sarvajanik Sabha is an influential and active association. It is in direct correspondence with the Bombay Government. The lead and advocacy which that public body has imposed upon itself are well directed to move that Government to take prompt and remedial measures in the provinces which are exposed to adverse scarcity and drought and the imminent spread of famine. There is but little doubt that famine of either a mild or severe type is prevalent in the whole of Maharashtra. In its able and comprehensive letter the Sabha has well portrayed the present condition of the people and has taken pains to mark out the deepening shadows of the shrinkage of private resources under the stress of hard struggle for bread. While we refer to these facts we congratulate ourselves that we are partially free from the miseries of our fellowmen. Is it not then our duty to lend a helping hand to our brethren?

---

The Mysore Government's famine

relief policy appears to us, says the *Advocate of India*, not only more generous but also more practical than that in force in British provinces. Political economists might take exception to the generosity, which is only possible with a large surplus of revenue; but nobody can take exception to the system of relieving weavers by buying a certain number of their cloths, or of relieving village labourers by employing them as far as possible in tasks to which they are accustomed. The last practical method of relief brought to our notice in Mysore is the construction by Government of drinking water wells near Police Stations and in the vicinity of State Forests and Plantations.

पुढील आठवड्यांत शिमग्याचा मोठा सण आहे आणि शिवाय शनिवारीं महावारुणी पर्व आहे तेव्हां सालाबादच्या मामूल वहिवाटी प्रमाणें आमचे वर्गणीदार संतोषानें आमची सुट्टी मंजूर करतील अशा भरंवशावर आह्मी आपली कचेरी बंद ठेवणार आहों तेव्हा तारीख १४ माहे मार्च सन १८९२ ह्मणजे मिती फाल्गुन वद्य १ शके १८१३ चा 'वऱ्हाडसमाचा' चा अंक निघणार नाहीं.

## वऱ्हाड.

रा. रा. त्र्यम्बक नारायण तारे शिरस्तेदार असिस्टंट कमिशनर-मलकापूर यांस बुलढाण्यास ६० रुपयाच्या डेपुटी क्लार्क आफ कोर्टचे जागीं नेमिलें आणि मलकापूरच्या शिरस्तेदारीवर बुलढाण्याहून रा. रा. शिवरामपंत कोरडे यांस बदलिलें असें कळतें.

रा० रा० गोपाळ रामचंद्र पिटके यांच्या आजारीपणाच्या रजेंतल्या वर्गावर्गीत रा. रा. सुंदर निळकंठ पांडे यांस येथील हायस्कूलांत २५ रुपये पगारावर सहावे असिस्टंट मास्तर नेमलें आहे.

येथील इंग्रजी आफिसांतील ८० रुपये पगाराच्या रिकाम्या झालेल्या जागेवर रा. रा. वामन नारायण काळे यांस नेमून त्यांच्या ताठाच्या जागेवर रा० रा० शंकर तुकाराम यांस बढती देण्यांत आली.

श्रीयुत महाशय स्वामी आत्माराम यांनीं आपल्या रसाळ वाणीनें, अद्भुत वाक्चातुर्यानें आणि विस्तारपूर्वक विचारसरणीनें अकोल्याच्या श्रोतृसमूहांस जीवरक्षण, गोरक्षण, राष्ट्रीय सभा, मूर्तिपूजा अशा चार विषयांवरील भाषणांत सुलभतेनें तल्लीन व रममाण करून सोडलें होतें. गेल्या मंगळवारीं स्वामी महाराज अकोल्याहून खामगांवास रवाना झाले. रावसाहेब देवराव विनायक यांनीं स्वामींचा नीट परामर्ष ठेऊन अकोलेकरांस या अलभ्य व बिनमोल भेटीचा लाभ पूर्णपणें मिळवून दिला या बद्दल आह्मी त्यांचे आभार मानतों.

मि० मीर अनवरअली तहशीलदार, अकोला, हे वकिलीच्या परीक्षेस बसणार आहेत तरी परीक्षा उतरल्यावर त्यांचा हेतु वकिली करण्याचा नसून आर्दी निराळा आहे. कृपावंत इंग्रज सरकारच्या पदरची चाकरी सोडण्याचा त्यांचा बिलकूल इरादा नाहीं असें त्यांनीं मुद्दाम चिठ्ठीनें कळविलें आहे.

करुणेश्वर प्रासादिक संगीत नाटक मंडळीनें परवा रात्रीं संगीत मालती माधवाचे सहा अंक करून दाखविले. माधव व कामन्दकी या पात्रांचीं कामें चांगलीं वठलीं. रंगभूमीवर निरनिराळ्या भूमिकेच्या पात्रांनीं जे नियम पाळले पाहिजेत त्या त्या पैकीं पुष्काळांचें उल्लंघन ही मंडळी करीत असते. आणि प्रेक्षकांच्या उत्तेजक उद्गारांचा मान राखीत नाहीं.

राव साहेब देवराव विनायक दिगंबर यांचें घराणें गजाननाचे उपासक असल्यामुळें त्यांनीं येथें गणेश मंदिर बांधलें होतें त्या देवालयाची व्यवस्था, पूजा अर्चा, व वार्षिक उत्सव हीं स्वयंत्र व सतत चालावीं ह्मणून कांहीं जमीनजुमला, वस्त्रालंकारादि भूषणें, व देवस्थानाची इतर स्थावरजंगम इस्टेट मिळून दहाबारा हजारांचा विषय निराळा तोडून देऊन त्यावरील आपलें व आपल्या वंशजांचें स्वामित्व ही त्यांनीं काढून टाकलें. रावसाहेबांस चुलते बंधु आदि करून आप्तमित्रांनीं अशा धर्मकृत्यास पूर्ण संमोदन दिलें व सिद्धिविनायकाचें संस्थान चिरस्थायी झालें हें पाहून मोठा संतोष वाटला. मनुष्यास बहुसाळ व नानाविध व्यवहारांत धनदौलत प्राप्त होते तिला आप्तस्वकीयांच्या संगोपनानें व धर्मकृत्यानें सद्रूप व उत्तमगती देणें हीच आयुष्याची गुरुकिल्ली होय.

## प्रोग्राम

वऱ्हाड हायस्कूल माजी समाज.:- सदर्हू समाजाचे सभासदांस कळविण्यांत येतें कीं चालू सालचे समारंभा करितां रावसाहेब देवराव विनायक वकील यांनीं मेहेरबानी करून आपले बगीच्यांतील बंगला दिला आहे. तेथें मंडळीचे उतरण्या करितां व जेवण्या खाण्या करितां चांगले प्रकारची सोय ठेविली जाईल.

प्रथम दिवशीं ह्मणजे तारीख १३ रविवार रोजीं मंडळींचीं स्नानें होऊन चहा वगैरे झाल्यावर सकाळीं ८ वाजतां त्याच बगीच्यांतील क्लब हाऊस मध्यें मंडळीच्या भेटी होतील. अध्यक्षांची नेमणूक होऊन मागील सालच्या रिपोर्ट वांचण्यांत येईल. अकरा वाजतां वाजतां भोजन होईल. नंतर पान सुपारी वगैरे होऊन दोन वाजतां गाणें होईल; व सध्याकाळीं चार वाजता कसरतीचे खेळ होतील. रात्रींचें जेवण सात वाजतां होईल.

दुसरें दिवशीं पूर्व दिवसां प्रमाणें मंडळीचीं स्नानें व चहा वेणें झाल्यावर आठ वाजतां व्याख्यान होईल. अकरा वाजतां भोजन दुपारी गाणें. सध्यांकाळीं जादूचा खेळ व सरकस व अध्यक्षा कडून समाजाचें विसर्जन. रात्रीचें भोजन सात वाजतां होईल.

बाळकृष्ण मोरेश्वर साठे
वामन नारायण काळे
सेक्रेटरी
वऱ्हा. मा. वि. समाज

वाशीम २९-२-९२

थंडी फार पडूं लागली. सकाळी फार गार वारा सुटतो. गांवांत तापाची सांथ आली आहे असें दिसतें. हल्लीं रोज एक दोन तापाच्या मुखीं बळी पडत आहेत, यामुळें लोकांत चिंता उत्पन्न झाली आहे. ईश्वर करो व यमस्वरूपी तापाचे लवकर उच्चाटण होवो.

येथील लोकप्रिय हास्पिटल असि० मि० रुकमया यांची बदली डोणगांव ता० मेहेकर येथें बढतीवर झाली. हे स्वभावानें उत्तम असल्यामुळें यांचा उपयोग लहान थोर सर्व लोकांना सारखा होत असे. यांनीं पैशावर नजर कधींही दिली नाहीं. यांच्यांत परोपकार बुद्धी असे. यांच्या वियोगानें येथील लोकसमुदायाला फार दुःख वाटणार आहे. त्याच प्रमाणें येथील डिस्ट्रिक्ट रजिस्टरचे कारकून मिस्तर दत्तात्रय शामराव पटवर्धन यांची बुलढाण्यास नवीन झालेल्या तेथील सब रजिस्ट्रारचे जागीं ३० रुपयांवर बदली झाली. हे गृहस्थ येथें साडेचार वर्षे होते. याचा पगार जरी मोठा नव्हता तरी सर्व लोकांत मिसळणें, कार्यतत्परणें लोकांच्या उपयोगीं पडणें, हे गुण यांच्यांत वास करीत असल्यामुळें यांचें जाणें ही लोकांना दुःखप्रद वाटत आहे. हे उभयतां गृहस्थ नवीन जागीं येथल्या प्रमाणेंच लोकप्रिय होवोत अशी आशा आहे. येथील सेकंड असि. मास्तर मि० नाटेश्वर नारायण चौक यांची बदली चिखलीस सारख्याच पगारावर झाली असें ह्मणतात. यांना फक्त येथें येऊन एक वर्ष झालें असें ह्मणतात. इतक्यांतच सारख्या पगारावर बदली होण्याचें कारण काय? अशी सहज शंका उत्पन्न होते. कोणी ह्मणतात एथील से०अ० ची जागा कमी केली ह्मणून असें झालें. यांत तथ्य किती असेल हें जरी खात्रीनें कांहीं ह्मणतां येत नाहीं तरी पण ज्या अर्थी मि० चौक यांचे बदलीं कोणी आला नाहीं. व असें ह्मणतात कीं पुढें ही कोणी येत नाहीं त्याअर्थी निघालेली बातमी खरी ठरते. कसें ही असो. एवढा मोठ्या शाळेंतील से० अ० ची जागा काढून टाकल्याबद्दल प्रत्येक इसमास वाईट वाटणार आहे. एकूण शाळाखातें सरकाराला ओझें वाटतें काय? एकूण सर्व प्रकारची कांटकसर याच खात्यांत होणार काय?

आज येथें म्युनि० इलेक्शन होणार आहे पोलिंग ऑफिसर मि० आंबादास संतो ए० अ० कमिशनर आहे. ह्या म्युनि० त लोकनियुक्त मेंबर ९ आहेत सरकार नियुक्त तीन आहेत येथें वार्ड तीन आहेत. पहिल्या वार्डांतील मुद्दत भरल्यामुळें दोन मेम्बर कमी होतात. ते हे कीं रा. रा. यशवंत वामन दिंग वकील व नाना सखदेव व तिसरे वार्डांतील गणु वाणी ह्या जागा भरण्या करितां आज तारीख नेमलेली आहे. बारा वाजल्या पासून काम येथील टाऊनहालांत सुरू होणार. पहिल्या वार्डांतील जाग्या करितां उमेदवार आहेत तेः-रा. रा. यशवंतराव वकील, नाना सखदेव, विनायकराव गोखले वकील, रामराव वकील, व चावक वकील व तिसऱ्या वार्डांतील जाग्या करितां गणु वाणी, यशवंतराव वकील, गोखले वकील. आतां यांतून कोणाचें नशीब उघडतें तें पहावें. लोकमत जिकडे अधीक तिकडे निवड मात्र शिकलेले, हुषार. काम करणार असे लोक पहिल्या वार्डांत आहेत व तिसऱ्यांतही आहेत हो ला हो लाऊन देणारे मेंबर जर निवडले गेले तर ते कामही तसेंच होलाहो करून करणार- काल पासून कित्येक जणाची कांहींना कांहीं मतें मिळविण्या बद्दल हस्ते पर हस्ते खटपट सुरू असल्या विषयीं लोकांत बोलवा आहे. कित्येक मतें देणारांना मोठी पंचाईत येऊन पडली आहे. एकाला काम दिलें तर एकाचो आपणावर इतराजी होईल- खरेंच बिन मांडवली कारखाना. फायदा ह्मणाल तर बोलूंच नका- राग मात्र प्रत्येकाचा प्रत्येकावर अतिशय या प्रमाणें आहे- निकाल काय होईल तें समजेल व तो आपणास कळवीन.

मिस्तर सायंना यांचे सेशनाची तारीख १।३।९२ होती त्याकरितां यांची एथून रवानगी होणारी होती परंतु तारीख ९।२।९२ नेमिल्याचें कळल्या वरून रवानगी लांबली असें बोलतात. मिस्तर सायंना हे अजारी असल्यामुळें सरकारानें यांस आकोल्या पर्यंत गाडी दिल्याचें बोलतात. खरें असल्यास सरकारच्या दयेचो तारीफ केली पाहिजे ईश्वर करो व या संकटांतून आमचे पोलीस मुकुटमणी सुटोत अशी ईश्वरापाशी प्रार्थना आहे.

आपला 'क्ष'

नोटीस

मे० इंदरसिंग अईदान शेट दुकान अकोलें ताजनापेठ यांसः—

नोटीस देणार नागोराव रावजी कास्त राहणार अंत्री मलकापूर यांजकडून कळविण्यांत येतें कीं, तुह्मांस यापूर्वी नोटीशीनें कळविलें होतें कीं, आमचे जे कांहीं रुपये आपल्याकडे आहेत, त्याजबद्दलचा सर्व हिशेब जमाखर्च वगैरे चार सावकार लोकांसमोर आणून निकाल करावा वगैरे. परंतु आजपावेतों तुह्मी कांहीं एक केलें नाहीं; उगीच तोंडी व नोटीशीनें पोकळ कळविता. व रुपयाचा निकाल करीत नाहीं याजकरितां ही नोटीस तुह्मास मुद्दाम दिली आहे, तर नोटीस पावल्या पासून एक महिन्याचे आंत सर्व हिशेबखातें, जमाखर्च वगैरे जे कांहीं आहेत ते चार सावकार लोकां-समोर आणून माझें मनाची खात्री करून देऊन माझें येणें हिशोबानें निघत असेल ते मजला द्यावें; किंवा तुमचे निघत असल्यास मजपासून घ्यावें. असें झालें नाहीं तर रीतीप्रमाणें फिर्याद करून अखेर निकाल होईपर्यंत जे माझें नुकसान होईल तें व फिर्यादी बद्दलचा व नोटीसा वगैरेचा सर्व खर्च आपले पासून भरून घेतला जाईल ह्मणून दिली नोटीस. तारीख ४ माहे मार्च सन १८९२ इ०

( सही. )
नागोराव रावजी कास्त रहाणार अंत्री मलकापूर
दस्तुर खुद्द.

## अकोला बाजारभाव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | | | ९९॥= |
| ,, ?९ दिवसाच्या मुदतीची | | | | | ९९॥= |
| सुवर्ण | २४ रुपे | १०८ | आळशी | | ९० |
| गहू | काठे | ७८ | बन्शी | | ८२॥ |
| जवारी | ४५ | चणे | ६० | सर्की | ४॥≡ |
| कापूस | | ३४ | | रुई | ४५॥ |
| मीठ | ३॥ | तूप | ८८- | तेल | ४॥= |

सध्याचे भाव. ( मोगलाई )

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | बसंत | १९४८ | ४९ |
| गहू | वैशाख शुद्ध १९४८ | | ६९॥ |
| आळशी | चैत्र शुद्ध १९४८ | | ८६॥= |
| सर्की | वैशाख नवे सालची | १९४८ | ९८॥ |

## वर्तमानसार.

सोसियल रिफार्मर्स व सरकारचा तिरस्कार करणारे यांनीं जर्मन देश सोडून चालतें व्हावें हें चांगलें. कारण ते निघून गेल्यास देशाचा फार फायदा होईल असें जर्मनबादशहानें ता. २४ रोजीं प्रसिद्धपणें बोलून दाखविलें. त्या वेड्या बादशहाची समजूत घालण्याकरतां आमचे पुण्याचे सुधारक तिकडे जातील तर फार चांगलें होईल. त्यांच्या तिकडे जाण्यानें आमच्यांतला बखेडा कमी होईल व त्या बादशहाची समजूत घातल्याचें त्यांस श्रय मिळेल. हे सुधारक त्या कामाकरतां कधीं रवाना होतात हें अगाऊ कळलें तर देशांतले पुष्कळ लोक हार तुरे देऊन त्यांची बोळवणी करण्यास येतील यांत कांहीं शंका नाहीं.

सरकारनें अफूचा व्यापार बंद करावा असें सोलापूरच्या लोकांनीं सभा करून ठरविलें व सुंदराबाई पवारणीचे आभार मानले.

गव्हरनरजनरल हे मार्च अखेरीस मुंबईस यावयाचे आहेत व ते परत गेल्यावर ह्मणजे एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यांत मुंबईचे गव्हरनर महाबळेश्वरास जाण्यास निघतील व त्यानंतर जानेरा व भावनगर येथें जाऊन येण्याचा त्यांचा संकेत असल्यामुळें एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यांत महाबळेश्वरास दाखल होतील असें दिसतें.

निजामच्या हद्दींतही दुष्काळाचा प्रादुर्भाव बराच वाढला आहे. निजामाचे मुख्य प्रधान व दुसरे कामदार हे दुष्काळ व्यवस्थेच्या मागें लागले आहेत. हैदराबाद व शिकंदराबाद इकडून आलेल्या बातमी वरून समजतें कीं, सार्वजनिक तळीं व विहिरी कोरड्या पडूं लागल्या असून लोकांच्या खाजगी विहिरींनींही होळे बटारल्यामुळें लोक फार फिकरींत पडले आहेत. विहिरींचें पाणी आटल्यामुळें बागांस व मळ्यांस शिंपणें करण्याची सोय नाहींशीं झाली व त्या करतां लोक आपापल्या बागा व मळे विकून टाकूं लागले आहेत. आजच जर असा प्रकार आहे तर पुढें काय होईल याची भिती वाटत आहे.

काठेवाडच्या संस्थानांत कांहीं गडबड सुरूं असल्यामुळें मदतीकरतां जास्त फौज मागण्यांत आली आहे व २१ व्या पलटणीचे १०० लोक तावडतोब आमदाबादेस रवाना झाले. व दुसऱ्या एका नेटीव पलटणीस रवाना होण्या करतां तयार असण्याचा हुकूम झाला आहे; आमदाबाद व राजकोट येथील फौजेच्या मदतीस दुसरी फौज गेली असें २५ ची तार सांगतें, पण हें काय प्रकरण आहे याचा कांहींच उलगडा होत नाहीं. बहुधा तिकडे जे दरोडेखोर उठले आहेत त्यांच्या करतां ही व्यवस्था असावी.

तान्साचें पाणी मुंबई शहरांत सोडण्याचा समारंभ गव्हरनरजनरलांच्या हातून ३१ मार्च रोजीं होणार व त्या समारंभाच्या थाटमाटाच्या खर्चाकरतां म्युनि० पा० नें ३०,००० रु. मंजूर केले आहेत.

मुंबई सरकारचे ओरिएंटल ट्रान्सलेटर मि० केळकर यांस गायकवाड सरकार मागून घेत असून आपल्या रिविन्यू खात्यांत एका मोठ्या जाग्यावर नेमणार आहे असें समजतें.

पार्शींच्या नाटकांत खलिफा हरुन रशीद यांचें जें सोंग आणलें जातें तें बंद करण्याविषयीं मुंबईच्या मुसलमानांनीं मुंबई सरकारास अर्ज केला आहे.

हिंदुस्थानांतल्या कायदे कौंसलाबद्दलचें बिल विलायतच्या लॉर्ड सभेंत पास होऊन पार्लिमेंटच्या कामन सभेंत दाखल झालें आहे व त्याचें पहिलें वाचनही झालें. लोकानियुक्त मेम्बर घेण्याचें ठरविल्यावाचून ही व्यवस्था हिंदुस्थानच्या लोकांस पसंत होणार नाहीं. अशी मि. मेक्नील हे तक्रार करणार आहेत.

लंडन येथील रोमन लॉच्या परीक्षेंत मनमोहोन लाल आगरवाला फर्स्ट क्लासांत आला.

हिंदुस्थानांतल्या डोंगरी तोफखान्याकडील आफिसरांस विश्रांती करतां ह्मणून फर्लो रजा जास्त देण्याचा सरकारानें ठराव केला आहे.

नाश विरुद्ध नबाब महमद अलीखान, या खटल्याची हकीकत विलायतच्या या आठवड्याच्या डाकेंतून इकडे आली आहे. यांतील नबाब हा हिंदुस्थानांतला एक मुसलमान गृहस्थ असून विलायतेस गेला. तेथें गेल्यावर एका इंग्रज स्त्रीच्या घरीं खाणावळ्या ह्मणून राहिला. त्या स्त्रीच्या एका १७।१८ वर्षांच्या वयाच्या तरुण अविवाहित मुलीशीं नबाब यांचें साटें जुळलें. कांहीं दिवस तीं दोघें चैनबाजी करीत जिकडे तिकडे हिंडलीं. नंतर नबाब हिंदुस्थानांत जाणार असें पाहून तिनें त्या नबाबावर लग्न करण्याचा करार करून मोडला अशाबद्दल कोर्टांत दावा लावला. त्या मुलीची बहीण, आई यांसाक्षी झाल्या व त्यांनीं अपल्या जबानींत त्या दोघांचें अयोग्य वर्तन चालूं होतें असें सांगितलें. नबाबानें आपला तिचा संबंध होता असें कबूल केलें, पण तिच्याशीं लग्न लावण्याचें मी कधीं कबूल केलें नाहीं असें सांगितलें. लग्नाचा करार झाल्याची गोष्ट शाबीत झाली नाहीं असें जज्जास वाटून जुरीसही तसेंच वाटलें व त्यावरून जज्जानें जुरीच्या मतानें त्या तरुणीच्या विरुद्ध हुकूमनामा केला; आणि त्यांत त्या तरुणीच्या वर्तनाबद्दल फार दोष दिला.

कलकत्ता युनिव्हर्सिटीचे गेल्या परीक्षेचे प्रश्न फुटल्यामुळें पाटणा येथील परीक्षा एप्रिलच्या सातव्या तारखेस पुन्हा होणार आहे. या प्रश्न फुटण्यांत कोणा नेटिवाचा संबंध नाहीं ना?

पंजाबचे हल्लींचे ले. गव्हरनर लवकरच पेन्शनर होऊन जाणार असल्यामुळें त्यांस शेवटचा सलाम करण्याकरतां नवीन होणाऱ्या ले. गव्हरनरांस अगाऊची सलामी देण्याकरतां पंजाबातले सर्व संस्थानिक लवकरच एकवट होणार आहेत. संस्थानिकांवर दर पांच वर्षांनी हा एक टाक्सच ह्मणावयाचा.

अलीगडच्या जत्रेंत आग लागून सर्व बाजार जळाला.

चिकागो येथें जें मोठें प्रदर्शन व्हावयाचें आहे त्याकरतां तयार होत असलेल्या इमारतीवर २१ एकर जमीनभर एका इंचाच्या पाचव्या भागाइतक्या जाडीची काच पसरली जाणार आहे असें सांगतात!

टर्कीच्या दरबारच्या बल्गेरीयन वकीलावर कोणी वार करून त्यास घायाळ केला. खुनी फरारी झाला.

इंडियन आफीसर बिल लार्ड सभेंत पास झालें. टा० अ०

निरनिराळ्या पक्षांच्या उडाणाच्यागति निरनिराळ्या असतात हें सहज समजतें परंतु कोणाची किती हें शोधाशिवाय समजणार नाहीं; हा शोध लावणाराचें असें ह्मणणें आहे कीं गिधाडपक्षी हा एका तासांत शंभराहून्ही जास्त मैल उडतो. हंस व चिमण्या एक प्रदेश सोडून दुसऱ्या प्रदेशांत जात असतां दर तासास नव्वद मैल प्रमाणें भ्रमण करतात शिक्षा न्यावयास शिकवलेलीं खबुतरें दर तासास साठपासून ऐंशी मैलपर्यंत उडतात व अशी एकसारखी कित्येक तासपर्यंत उडत असतात; आणि कावळा हा फक्त पंचवीस मैल जाऊं शकतो.

कानपुराकडे दुष्काळानें पिडीत होऊन लोक आत्महत्या करूं लागले आहेत! कर्नूल परगण्यांत मेदरी नांवाच्या एका गांवीं एकानें पाण्यांत उडी टाकून जीव दिला. आणि याचप्रमाणें पूर्णपूर वगैरे कांहीं गांवीं लोकांनीं आत्महत्या करून घेतल्या.

सदर्न मराठा रेल्वेकंपनीनें नेटिव तरुण लोकांस फायरमन वगैरेच्या जागा देण्याचे नवीन नियम केले आहेत. युरेशियन व फारशी लोकांस ज्या पगाराच्या फायरमन व ड्रायव्हरच्या जागा कंपनी देते, तशाच पगाराच्या जागा ब्राह्मण वगैरे उच्च जातींच्या व कुलीन घराण्यांतल्या उमेदवारांस देण्याचा कंपनीचा विचार आहे. नोकरीकरितां काळजी करणाऱ्या तरुण नेटिव लोकांस ही बरी सोय झाली असें ह्मणण्यास चिंता नाहीं. या रेल्वे प्रमाणेंच जी. आय. पी रेल्वे व बडोदा रेल्वे विशेष सवडीचे नियम करील, तर नेटिवांना उद्योग मिळून कंपन्यांनाही पैशाचा फायदा होईल.

राणी सरकारची अशी इच्छा आहे कीं, आपले मागें आल्बर्ट एडवर्ड प्रिन्स आफ वेल्स राजपदावर आले असतां त्यांनीं 'सातवा एडवर्ड' अशी पदवी न घेतां 'पहिला आल्बर्ट' हें नांव घ्यावें; कारण आल्बर्ट हें राणीच्या भ्रताराचें नांव असून प्रिन्सचेंही एक नांव आहे. सु० प०

आपली गायनविद्या किती योग्यतेची हें जोंवर कोणास दाखवितां येत नाहीं तोंवर इंग्लिश ल्यांडचे मधूर स्वरानें मन तल्लिन होणार आहे परंतु ज्यांस तें ज्ञान पूर्णपणें समजलें जाईल तो हिंदु आलाफशिवाय कोणताच आलाफ पसंत करणार नाहीं. हल्ली इंग्लडांत एक उत्तम हिंदु गवई गेला आहे तो दर आठवड्यांत टिकिटा लावून "हिंदुगायनाची थोरवी" हा विषय प्रतिपादन करीत असतो. यानें बरोबर उत्तम गवय्या नेलाअसून इंग्लंडची एक पियानो वाजविणारी स्त्री नोकर ठेविली आहे तिजकडून आपल्या सुरावर पियानो लावून विषय प्रतिपादून समई प्रत्यक्ष सूर बठवून वर्जावर्ज हराच्या गायनानें सर्वांस तल्लीन करून सोडतो गेल्या आगबोटीमधून या गवयाच्या संबंधांत जी माहिती आली आहे त्यावरून समजते कीं या गवयानें तिकडील गुणग्राही लोकांस

केदार आणि बहिरवी

रागांत अगदीं गुंग करून टाकलें आहे. मि० वार्डल या कामांत साह्यकारी आहेत अलीकडे सुधारक सर्वच गोष्टी पश्चिमेकडील चांगल्या ठरवून आपल्या गुणाचा ह्यावज्या आपल्या हातें करून घेतात त्यापेक्षां ते वरचढपणा न दाखवितां समाजपद्धतीची पूर्ण माहिती करून घेऊन आपले अमोल गूण पुढें आणतील तर त्यांत अतिशय मोठेपणा मिळणार आहे.

ज्या कोणास व्हालंटियर होण्याची सरकारनें परवानगी दिली असेल त्यांच्या बाबदींत सरकारानें एक सवलतीचा ठराव बाहेर केला आहे त्यांतील मुख्य कलमें:—

१ व्हालिंटियर होऊं इच्छिणारावर इनकमट्याक्स बसऊंनये.

२ त्यास इंग्लंडास जाण्यास फुकट पास मिळावा.

३ हिंदुस्थानांतील हव्या त्या रेल्वेनें प्रवास करण्याचा फ्री पास मिळावा.

४ पेनशन मिळण्यांस जितकी वर्षे सरकारी नोकरी करावी लागते त्याहून यांस कमी वर्षांची इयत्ता असावी.

५ हरएक विद्यालयांत व्हालंटियर लोकांच्या मुलांस फुकट शिक्षण देण्याचा ठराव करावा.

अशा लालुचीनें व्हालंटियर करूं पहाणाऱ्या सरकारचे हेतू कितपत यशास जातील तें सांगवत नाहीं.

इन्फ्लूएन्झा तापानें सर्व इंग्लंड घाबरून सोडले आहे, या योगानें शेकडा ४६ मनुष्यें मरण पावली, कांहीं भागांत तर इतकी संख्या वाढली कीं, शेकडा २० बाकी रहातात, अशा वेळीं दूर दूर शहरावरील सुतारांनीं आपापलीं दुकानें उघडून मोठ मोठ्या काळ्या अक्षरांनीं भितीवर जाहिराती लावल्या आहेत कीं "मुडद्याच्या पेट्या ५ मिनिटांत तयार करून देऊ" अशांची संख्या अगणीत वाढली. हा रोग इंग्लंडांत पसरण्याचें मूळ कारण चांगली थंडी पडली नाहीं हें सांगतात. एवढाले नामांकित डाक्टर असून त्याजकडून या रोगाचा पराजय होत नाहीं मग सॅनेटरी खात्याची मातबरी काय राहिली ! ! म० मि०

राक्षसी पूल—चीन समुद्रांतील एका खाडीवर एक राक्षसी पूल आहे. हा पूल दगडाचा असून पांच मैल लांब आहे. आणि याला तीनशें कमानी आहेत. प्रत्येक कमानीची उंची सत्तर फूट आहे. व पुलावरील रस्ता ७० फूट आहे. इंग्लिश खाडीवर असाच एक जंगी पूल बांधण्याचा विचार आहे. हा बावीस मैल लांबीचा व्हावयाचा असून याला ४० कोट रुपये लागतील असें ह्मणतात.

गार्नर या नांवाचा एक अमेरिकन शास्त्रवेत्ता हा वानर जातीमध्यें कांहीं भाषा आहे कीं नाहीं याच्या शोधाला लागला आहे. दहा शद्व ते वापरतात असा त्याचा स्वतःच्या अनुभवावरून आनमास आहे. तो ध्वनी वाहक व इतर यंत्रें यांच्या बरोबर घेऊन आफ्रिकेतील वानरांच्या वस्तींत एका लोखंडाच्या पिंजऱ्यांत जाऊन बसणार व तेथें आपले प्रयोग करून पहाणार आहे. काय विलक्षण शोध व उपाय आहे हा! न्या० सि०

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांणीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्षाची | अगाऊ रु० ५ | डांक हाशील | | ०।१३ |
| सहामाही | " | ३ | " | ०।८ |
| सालअखेर | " | ७ | " | १।८ |
| किरकोळ अंकास | | | | ०।४ |

नोटिशीबद्दल.

| | | |
|---|---|---|
| १० ओळीचे आंत | | रु० १ |
| पुढें दर ओळीस | | ०।०६ |
| दुसरे खेपेस | | ०।०।६ |

SUBSCRIPTION

| | Rs. | | | |
|---|---|---|---|---|
| annum in advance | 5 | Postage | 13 | a |
| annum in arrears | 7 | ,,1Rs | 8 | as |
| Six monthly............ | 3 | " | 8 | as |
| Single copy............ | | | | 4 as |

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines...2 as
per line over10...4Rs
Repetition per line3a

VOXXVI — AKOLA MONDAY 21 MARCH 1892 — NO II

वर्ष २६ — सोमवार तारीख २१ माहे मार्च सन १८९२ इ० — अंक ११


## आम्ही कांग्रेसला विसरलो कीं काय?

( लिहून आलेला मजकूर )

वाचकहो ! मी जे विचार आज आपल्या पुढें ठेवणार आहे ते माझ्या बुद्धीच्या मानानें व विषयाच्या महत्वाच्या मानानें फारच कोते आहेत. माझे विचार कितीही कोते असोत परंतु मी ज्या विषया संबंधानें लिहिण्याचे धाडस केलें आहे तो विषय फारच महत्वाचा आहे. किती महत्वाचा आहे हें सध्यां प्रत्येक वाचकाला ( निदान हिंदुस्थानांतील वर्तमानपत्र वाचणाराला ) विदितच आहे. असा कोणता कोणत्याही भाषेंतील वर्तमान पत्राचा वाचणारा आहे कीं ज्याला कांग्रेस ( राष्ट्रीय सभा ) हा शब्द व ही संस्था माहीत नाहीं. हिचें महत्व काय व इनें आजपर्यंत काय काय केलें हें सांगण्याचा माझा आजचा विचार नाहीं हें आपणाला वरील शिरोलेखावरून कळून येईलच. ते ठराव आपणा सर्वांनां माहीत आहेतच व काय काय ठराव तिनें पास केलें हें जर आपणाला माहीत नसेल ( नसेल असें होणें नाहींच ) तर आपण कृपाकरून तिचे दरवर्षी प्रसिद्ध होत असलेले रिपोर्ट वाचा.

आज सात वर्षें जिला तुम्हीं वाढविलीत, सात वर्षें पर्यंत तिच्यावर तिच्या शत्रूकडून हल्ले होत असतांही तुम्ही जिचें संरक्षण केलेत, सात वर्षें पर्यंत जिनें तुमच्या दूर दूर देशावर असलेल्या बंधूंच्या मुखत्यारांची भेट करून दिली, तुमची ओळख वाढविली, तुम्हाला नाना प्रांत ( हिंदुस्थानांतीलच ) पहावयाला लावलें व जिनें तुम्हाला एक तऱ्हेच्या तुमच्या गाढ निद्रेंतून जागें केलें त्या कांग्रेसला, त्या आर्यभूमीच्या भगिनीला तुम्ही एकटीच सोडून देणार. कांग्रेसला सोडून देणार !!! सात वर्षांचें तुमचे श्रम, सात वर्षें खर्च केलेली रकम, बाबू सुरेंद्र नाथ बानरजी मि. मुधोळकर, मि. नार्टन व विलायतेंतील आपणासाठीं खटपट करणारी मंडळी ह्यांचें हे श्रम तुह्मी फुकट घालविणार !!! छे छे !! तुह्मी इतक्या लोकांचे व तुमचे हे श्रम खात्रीनें फुकट घालविणार नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या श्रमांचें चीजच कराल. ही कांग्रेस श्रीमंत लोकांचीच नाहीं. ही कांग्रेस तुमच्या आमच्या सारख्या गरिबांचीच आहे कांग्रेसच्या मागण्या प्रमाणें जर मिठावरील कर कमी झाला तर त्या पासून श्रीमंता पेक्षां गरीबांचाच किती फायदा होणार आहे बरें. दोन आण्याच्या ठिकाणीं तीन आणे किंबहुना चार आणे देण्याला श्रीमंत लोक तयार होतील परंतु गरीब लोक हो!! मोलमजुरी करणाऱ्यांनो !! भिक मागून पोट भरणाऱ्या लोकांनो! हेच चार आणे मिळविण्याला तुह्माला किती श्रम पडतात, तुह्माला उन्हाळ्यांत भर उन्हांत दोन आण्या करितां आंग तापवून घ्यावें लागतें. भर उन्हाळ्यांत दोन प्रहरीं विस्तवाजवळ बसावें लागतें. पायाला डाव देणाऱ्या धुळींत काम करावें लागतें. तेव्हां कोठें दोन आणे मिळतात व ह्याप्रमाणें जेव्हां दोन दिवस काम करावें तेव्हां कोठें चार आणे हातांत पडून मिठवाल्याच्या दुकानीं तुह्मी जाणार. उन्हाळ्याचेच दिवस कशाला! हिवाळ्यांत सुद्धां कडकडीत थंडीच्या वेळीं उघड्या मैदानांत, वाऱ्यांत हातांत कुऱ्हाड घेऊन—जेव्हां बोटें लवकर वळत नाहींत अशा वेळीं काम करावें लागतें. प्रत्येक ऋतूंत तुमचे हाल आहेत. ते हाल कांग्रेसच्या योगानें नाहींसे होतील असें नाहीं. परंतु कांग्रेस एव्हढें मात्र करूं शकेल कीं तुह्माला एक पदार्थ घेण्यासाठीं जितके श्रम सध्यां करावे लागत आहेत त्या पेक्षां कमी श्रम करून तोच पदार्थ तुह्माला घेतां येईल.

ही कांग्रेस नुसत्या विद्वान लोकांचीच नाहीं, ही कांग्रेस अडाणी शेतकऱ्यांची ही आहे. जमिनी वरील धारा कायमचा ठरला तर त्याच्या योगानें कोणाचा बरें जास्त फायदा होणार आहे? शिक्षित शेतकऱ्यांचाच कीं काय? नाहीं मूळाक्षरांशीं ज्या शेतकऱ्याची ओळख देखील नाहीं त्या शेतकऱ्याचा देखील फायदा आहे. वर जें उदाहरण मजुरांच्या संबंधानें सांगितलें तें मजूर तरी शिक्षितच असतात असें नाहीं. कांग्रेसचे पुढारी लोक आणखी सरकारला काय मागतात तर अडाणी अक्षरशून्य जीं मनुष्यें आहेत त्यांच्या शिक्षणा करितां जास्त पैसा खर्च करा. तेव्हां अर्थातच नुसत्या शिक्षितांचीच ही सभा आहे असें ह्मणतां येईल काय? बरें शिक्षितांची नाहीं असें तरी ह्मणतां येईल काय? तेंही नाहीं ज्या प्रमाणें शिक्षितांचा ह्या सभेवर हक्क आहे त्याच प्रमाणेंच तुमचाही आहे.

ही सभा नुसत्या ब्राह्मणाचीच, किंवा हिंदूचीच किंवा मुसलमानाचीच नाहीं. ही सभा सर्व जातींच्या सर्व लोकांची आहे. मिठावरील कर, कायदेकौन्सीलें सुधारणें, आपल्या लोकांना व्हालंटियर होऊं देणें, ह्या मागण्या हिंदू, मुसलमान, पारशी ह्यांच्यापैकीं एकाच्याच फायद्याच्या आहेत असें नाहीं. ह्या देणग्या जर सरकारांनीं कृपाळू होऊन दिल्या तर ह्यामध्यें सर्वांचा सारखाच फायदा आहे.

ही सभा केवळ सुधारकांचीच ( सध्यां जे आपणाला सुधारक ह्मणवून घेतात त्यांचीच ) नाहीं. ही सभा केवळ राजकीय सुधारणा तेव्हढ्याच मागते आहे. समाज सुधारणेची अग्रणी मंडळी त्यासंबंधानें खटपट करीत आहेच. कांग्रेस सभा सरकारच्या विरुद्ध आहे अशा तऱ्हेचा तुमचा जर ग्रह झाला असेल तर तो अगदीं सोडून द्या. स्वतः आपल्या महाराणी साहेबांच्या प्रतिनिधींनीं आपल्या एका पत्रांत ही सभा अगदीं राजाज्ञानुवर्ती आहे असें कबूल केलें आहे. शिवाय मुंबई येथें दोन वर्षांचे मागें एकप्रसिद्ध गृहस्थ काय ह्मणाले होते ते आपल्या अगदीं स्मरणांत असेल. त्या गृहस्थाचें नांव आपणाला सांगावयास मी पाहिजे काय? ते गृहस्थ चार्लस ब्राडला.

"That is no real loyalty which is only blind submission" ( अंधानुवृत्ति ही खरोखर राजनिष्ठा नव्हे. ) "Real loyalty means that the gonerned help the governors by leaving little for the Government to do" ( खरी राजनिष्ठा ह्मणजे शासित हें शास्त्यांनां मदत करतात आणि सरकारालाच करावयाचें असें फार थोडें ठेवतात ). आणखी ते ब्राडला साहेब काय ह्मणाले "But for whom should I work if not for the people. Born of the people, trusted by the people I will die for the people. And I know no geographic or race limitations. परंतु लोकां करितां खटपट करूं नको तर कोणाकरितां करूं? ज्यांच्यामध्यें माझा जन्म झाला, ज्यांनीं माझ्यावर विश्वास टाकला त्या लोकांच्या करितांच मी आपला देह खर्ची घालीन. भूगोल व विषयक जातिविषयक मर्यादा मला मुळींच माहीत नाहींत." आपले अधिकारी सांगतात ते चांगले किंवा वाईट याचा विचार न करितां मेंढ्या सारखें त्यांच्या मागून जाणें अथवा ते सांगतील त्या प्रमाणें अंधत्वानें ऐकणें ही खरी राजनिष्ठा नव्हे. खरी राजनिष्ठा ह्मणजे आपण सरकारला आपले नाना तऱ्हेचे विचार कळविले पाहिजेत. आपल्या काय काय अडचणी आहेत तें सरकारला कळविलें पाहिजे. सरकारवर एखाद्या परचक्राचा हल्ला झाला असतां डाव्या हातावर शीर घेऊन लढाईला तयार झालें पाहिजे व सरकारला परचक्राच्या हल्ल्यांत अगदीं कमी काम करून ठेविलें पाहिजे. सरकारनें आपलें रक्षण केलें पाहिजे व सरकारचा अधिकार कायम राखण्या करितां आपण आपली पराकाष्ठा केली पाहिजे. वाचकहो!! पुढील ब्राडला साहेबांचे शब्द प्रत्येक मनुष्यानें आपल्या हृदयावर सोनेरी अक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखे आहेत. त्यांच्यांमध्यें माझा जन्म झाला ज्यांनीं माझ्यावर विश्वास टाकला त्यांच्या करितां मी मरेन ( मरेपर्यंत खटपट करीन ) तुह्मी त्यांनां जातांना जें काम सोंपवून दिलेंत त्या प्रमाणें हिंदुस्थानांतून गेल्या बरोबर तुह्माला वचन दिल्या प्रमाणें पार्लमेंट उघडल्या बरोबर त्यांनीं आपलें काम पार्लमेंट सभेमध्यें सुरूं केलें. हें शब्द तुह्मी वसे काय पण सध्यां जे मी पुढारी मी पुढारी ह्मणून छातीला हात लावतात त्यांनीं सुद्धां नीट लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. आह्मी पुढारी ह्मणून ह्मणवून व ज्यांचें ह्मणून आपण पुढारी ह्मणवून घेतो त्यांचें एखादें काम असलें ह्मणजे घरगुती अडचणी पुढें करायच्या. हें खरें पुढारीपण नव्हे. आमच्या वाचकांपैकीं कांहींजणांचें मत कदाचित असें असेल कीं आज सात वर्षें कांग्रेस भरत असतें तिनें ठरावावर ठराव केले आहेत पण त्या ठरावांपैकीं सरकारनें तुह्माला काय दिलें आहे? दिसून पडण्यासारखें अजून पर्यंत कांहीं दिलें नाहीं हें खरें पण आपण ही एकदम आपल्याला सर्व कांहीं मिळेल असें कधींही मानूं नये. मुलानें बापाजवळ एखादी जिन्नस मागितली असतां त्याचा बाप त्याला त्याच वेळीं ती जिन्नस न देतां बाजारांतून आणून देईन असें सांगतो. ह्याचा तरी अर्थ काय? आपण जे मागतो ते आपल्या बापाच्यानें देववेल कीं नाहीं हें त्या लहानग्या मुलाच्या मनांत कोठून येणार !! एखादी जिन्नस चांगली दिसली कीं ती तो मागावयाची खटपट करणार व मागणार ही. परंतु ती वस्तू देतां येण्यासारखी आहे कीं नाहीं हें पहाणें त्याच्या बापाचें आहे. जर तो मुलगा एखादा चाकू मागेल तर तो चाकू वापरण्याची त्या मुलाला अक्कल आहे कीं नाहीं हें त्या बापानें पहिल्यानें पाहिलें पाहिजे. त्या प्रमाणें आपण कितीही राजनिष्ठेनें एखाद्या गोष्टीची मागणी केली तरी ती देण्यास योग्य आहे किंवा नाहीं हें सरकारनें पहिल्यानें पाहिलें पाहिजे व तें सरकार पहात असेल ह्मणून आज सात वर्षें कांग्रेस भरवून अजूनपर्यंत सरकारानें कांहीं दिलें नाहीं. एवढ्यावर त्या कांग्रेसला सोडूं नका "Do not expect too much and do not expect all at once" पुष्कळ गोष्टी आपणाला मिळतील असें वाटूं देऊं नका आणि सर्व गोष्टी आपणाला एकदम प्राप्त होतील असें ही समजूं नका. हि ब्राडला साहेबांची उक्ती आपल्या स्मरण पटलांतून घालवूं नका "Do not be disappointed if of the largest claims only something is conceded. If not just now it shall be on a day that is to come." तुमच्या पुष्कळ मागण्या पैकीं, जरी थोड्या मागण्या तुह्माला दिल्या तरी तेवढ्यानें निराश होऊं नका. जरी त्या तुह्माला प्राप्त झाल्या नाहींत तरी पुढें पुष्कळ दिवस यावयाचे आहेत त्यापैकीं एखाद्या दिवशीं या खात्रीनें प्राप्त होतील. नागपुरास कांग्रेस भरली होती, त्या प्रसंगीं लोकांनीं वरील बोधाचा ठसा मनावर पक्का बिंबवून घेतला असें त्यांच्या विचारावरून दिसलें. परंतु ज्या उदार आत्म्याच्यां बळावर अल्हाबादेस आपण जमणार होतो तो उत्तम लोकासी झाला आहे तेव्हां त्याचा हेतु पूर्णतेस नेण्यासाठीं प्रत्येक देशाभिमानी पुरुषानें सध्यांपासूनच कंबर बांधलीं पाहिजे.

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य ८ शके १८१३

वऱ्हाडांतील हायस्कूलांत शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांचा एक समाज आहे. त्या समाजाचा दर वर्षीस अकोल्यास किंवा उमरावतीस आळीपाळीनें शिमग्याच्या सुट्टींत मेळा भरत असतो. चालूं साली सदर्हु समाजाचा पांचवा मित्रमेळा अकोल्यास भरला होता. गेल्या १३।१४ तारखेचे दोन दिवस महा सणाचे मोठ्या आनंदोत्सवांत गेले. बुलढाणा, मलकापूर, वाशीम, इलिचपूर उमरावती वगैरे दूरदूरच्या व इतर नजिकच्या ठिकाणाहून आलेले आकोला मुक्कामचे माजी विद्यार्थी मिळून दीडशेवर लोक जमले होते. जमलेल्या पाहुण्यांचें आदरातिथ्य व्यवस्थेशीर व टापटीपीचें होतें. समारंभाचें स्थळ सुशोभित व रमणीय केलें असून खाण्यापिण्याचा बातबेत उत्कृष्ठ ठेवला होता. सर्व मंडळीच्या धूळभेटी झाल्या पासून समारंभ आटपे पर्यंत मंडळीच्या करमणुकीसाठीं मनोरंजनाच्या व मौजेच्या अनेक गोष्टी करण्यांत आल्या. गंजिफा, पत्ते, बुद्बळें इत्यादि खेळ चालले असत, गवयी व नायकीण यांचीं गाणीं झालीं, सरकसचा व कसरतीचा खेळ झाला, बोधपर व्याख्यानें झालीं, गुढ प्रश्नांचा खल चालला होता येणें प्रमाणें रिकाम्या गप्पाचप्पांत आणि विनोदानें व मोकळ्या मनानें हसण्याबोलण्यांत दोन दिवसांचा काल न कळत सत्वर निघून गेला. समाजाच्या नांवा प्रमाणें त्याज पासून फायदे होण्या सारखे आहेत ते यथावकाशें आपोआप घडून येतीलच. हायस्कुलांस पी० ई० चा वर्ग जोडण्या संबधानें समाजांत सूचना घाटत आहे. अध्यक्ष राजश्री हरी भाऊ साहेब यांनीं आपलें काम चांगलें केलें. आणि व्यवस्थापक मंडळींतील गोडीगुलाबीचा हुकूमी कारभार वर्णनीय होता.

समाजापुढें सरकसचा व कसरतीचा खेळ येथील तालीम मास्तर रा. रा. बळवंत गणेश यांनीं करून दाखविला. वस्ताद बहुगुणी आहेत आणि अधिकाऱ्यांकडून वाहवा मिळविलेले आहेत. परंतु बारापंधरा वर्षांत गृहस्थ बाराच रुपये पगारावर बहाल आहे राजश्री बळवंतरावजीस समाजा कडून मौल्यवान उपरणें जोडी बक्षीस देण्यांत आली.

———

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. एज्युक्याशनल इनस्पेक्टर यांचें गेल्या सोमवारीं सायंकाळीं वऱ्हाड-हायस्कूल-माजी विद्यार्थी समाजा पुढें व्याख्यान झालें, व्याख्यानास समाजा बाहेरील गांवांतील सभ्य गृहस्थ ही जमले होते. राजश्री आण्णा साहेब यांस व्याख्यान देण्याविषयीं समाजांतील पुढाऱ्यांनीं आयत्या वेळीं आग्रहपूर्वक विनंती केली ह्मणून त्यांनीं संभाषणाचा विषय ही एखादा शास्त्रीय न घेतां साधा व समयास उचित असा घेतला होता. समाजांतील सभासदांचीं कर्तव्यें कोणतीं व तीं कशीं बजावलीं पाहिजेत या मुद्यावर भाषण झालें तरी एकंदरीनें त्यांत त्यांनीं प्रत्येक मनुष्यानें व्यवहारांत कसें वागावें याविषयीं ठोकळ दिशा दाखऊन दिली. भाषण बोधपर असून चित्तवेधक झालें. भाषा निव्वळ मराठी आणि साधी असल्यामुळें भाषण कानाला फार गोड लागलें. विषय सुगम व सोपा वाटला आणि दृष्टान्तांनीं विषयाची फोड नामी झाली. त्यांच्या भाषणाचा गोषवारा येणेंप्रमाणें.—

प्रारंभीं आण्णा साहेबांनीं सांगितलें कीं, एखाद्याची नेमणूक अॅक्टिंग असली ह्मणजे जसें त्याच्या हातून काम होतें त्या प्रमाणें आपल्या हातून आजचें काम होईल. सभेस सोळा सतरा वर्षांचे वयापासून पंचावन वर्षां पर्यंतचे गृहस्थ जमले आहेत तेव्हां माझ्याहून जास्त शिकलेले, वयानें व अनुभवानें अधीक अशांस उपदेश करण्याचा माझा अधिकार नाहीं तरी लहान वयाचे, नुकतेच शाळेंतून बाहेर पडलेले अशांस उपदेशपर भाषण होईल आणि इतरांस त्या पासून कांहीं उपदेश घेण्या सारखा वाटल्यास तो त्यानीं धाकट्या पासून ही शिकावा अशी संस्कृतांत ह्मण आहे.

समाजाचे हेतु कोणते, कर्तव्य कोणतीं वगैरे गोष्टींचा विचार करण्याचा काळ आला आहे. लहान मुलें बालपणच्या दुर्धर प्रसंगांतून चार वर्षें निभावलीं ह्मणजे त्यांस जीवित आहे, त्याला पूर्ण आयुष्याची मिती आहे असें आपण मानतो. त्या प्रमाणें आपल्या समाजास चार वर्षें झालीं आहेत त्याच्या लहाणपणचीं वर्षें खेळण्यांत हिंडण्यांत संपलीं. आतां शैशव काल निघून गेला आहे तेव्हां समाजाला पितृस्थानीं, मातृस्थानीं धात्रीस्थानीं आपण आहों ह्मटलें तरी हरकत नाहीं. तेव्हां आपण काय करावें ह्मणजे आपण स्वतां करितां, घरच्या मंडळी करितां आणि दुसऱ्या करितां काय काय केलें पाहिजे याचा विचार करणें आहे.

एका ठिकाणीं राहणारे, एका कुळांत जन्मलेले, एका जन्मभूमीचे अशा लोकांची जशी एक निराळी जात होतें आणि ते एका जातीचे बनतात त्या प्रमाणें या समाजाची मंडळी एकवटली आहे. हायस्कुलांत सर्वजण शिकले आणि हायस्कुलांतून ही मंडळी बाहेर पडली आहे. देशाच्या अभिमानानें गांवाच्या अभिमानानें, किंवा कुळाच्या अभिमानानें लोक जसें एक होतात तसें आपणा मध्यें एका शाळेचे नातें. आहे, पुण्या मध्यें शनवारांत, बुधवारांत आणि शुक्रवारांत राहणारे असे तिघेजण कराचीस भेटले ह्मणजे आपण सर्व पुण्याचे एकच, एका ठिकाणचे असें ते समजात त्याहून आपले हें नातें जास्त जवळचें आहे. आपण एका मातेचें दुध प्याला आहों, एकाच दुधाचे पोषक गुण आपल्या आंगीं खेळले आहेत, आपण एक बंधु आहों, एका मातेच्या पोटचे आहों तेव्हां आपली परस्परांशी ओळख व्हावी, एकत्र गांठी पडाव्या या साठीं कांहीं तजवीज झाली पाहिजे. समाजाची योजना त्यासाठीच आहे परंतु ओळखी करून देण्याची विशेष प्रकारची व्यवस्था पाहिजे. हायस्कुलांतले असिस्टंट मास्तरांनीं आपल्या हाता खालील मुलें जीं शाळा सोडतील त्यांची यादी ठेवावी हींच मुलें पुढें समाजांत यावयाचीं असतात. शिवाय इतर जुन्या मंडळी विषयीं तपशीलवार माहिती एकत्र करून डायरेक्टरी तयार करावी. ही डायरेक्टरी छापवावी आणि त्याची एकेक प्रत प्रत्येक इसमा जवळ असली पाहिजे. या डायरक्टरीचा मोठा उपयोग आहे. आपण कोणत्या गांवीं गेलों तर तिज वरून आपल्या ओळखीचे तेथें कोण कोण आहेत हें झटकन समजतें. मला प्रत्यक्ष अनुभव आहे. मी डेक्कन कालेज ग्यादरिंगचा समासद आहे. सुरतेला किंवा धारवाडाला गेलों तर आपण डेक्कन कालेजचे असें म्हणून तेथील दुसऱ्या गृहस्थाच्या घरीं पाहुणे म्हणून जाण्याला संकोच वाटत नाहीं आणि तशा कारण्यानें परस्परा मधील प्रेम वाढतें. हीं प्रेमबंधनें वाढण्या साठीं आपण खटपट केली पाहिजे.

हायस्कुलांतून सांप्रत विद्यार्थि शिकत आहेत त्यांनां या प्रेमपाशांनीं बांधावें या साठीं त्यांस साह्य दिलें पाहिजे. त्यांच्या साठीं व्याख्यानें द्यावींत, लायब्ररींतून त्यांस पुस्तकें देतां येतील अशी व्यवस्था करावी आणि अशा अनेक उपायांनीं जुनें व नवें यांचें संमेलन झालें पाहिजे आणि तें संमेलन अक्षयीचें झालें पाहिजे.

आपण एका समजांतले आहों, आपल्या मध्यें एक जीवित आहे आणि आपल्या मध्यें एक प्रेमबंधन आहे तेव्हां आपण काय काय केलें पाहिजे हा प्रश्न येतो. पहिली गोष्ट म्हणजे स्वताची सुधारणा होण्या साठीं काय केलें पहिजे ही होय. शाळेमध्यें गुरुमुखानें शिक्षण मिळत होतें परंतु पुढें शाळा सुटल्या नंतर शिक्षण कसें मिळावें? शाळेंतल्या प्रमाणेंच जन्मभर प्रत्येकानें विद्यार्थि राहिलें पाहिजे. बहुतजण घरीं विद्यार्थि असत नाहींत. वयपरत्वें अनुभवानें ज्ञानवृद्धि होत असतच पण त्या साठीं खटपट मात्र कोणाची नसते, तर मुद्दाम खटपट करून ज्ञान संपादन केलें पाहिजे. यदृच्छया ज्ञान संपादन होईल तेवढें पुरें नाहीं. इतरामध्यें आणि आपणा मध्यें खटपटीनें मुद्दाम ज्ञान संपादन करण्याचा भेदक गुण असला पाहिजे. पुस्तकें, वर्तमानपत्रें वाचणें, व्याख्यानें देणें, निरनिराळ्या विषयावर चर्चा करणें वगैरे गोष्टी आपणा मध्यें सतत चालल्या पाहिजेत. पुर्वीचा तेवढी सामुग्री किंवा भांडवल आहे तेवढ्या वरच चालणार नाहीं. आपली पुंजी आपण वाढविली पाहिजे. पुस्तकें व वर्तमानपत्रें कोणतीं वांचावीं हें ज्याचे त्यानें आपल्या इच्छेनुरूप व हेतुनुरूप करावें. नुसत्या वाचण्याची भराभर अगदीं नको. पदार्थ वाटेल तसे एका भांड्यांत टाकून कुलूप लावून टाकलें तर ते जसे लागतील तसतसे मिळणार नाहींत त्या प्रमाणें कोरडें वाचन उपयोगी नाहीं. ग्रंथाची योग्यता, त्यांतील विषय, हीं चांगलीं मनन करून त्यांतला आद्यांश घेतला पाहिजे. दुकाना मध्यें माल इकडे तिकडे अस्ताव्यस्त पडला ह्मणजे गिऱ्हाइकाला पाहिजे तो आणि पाहिजे तेवढा जिन्नस वेळेवर देतां येणार नाहीं तसें मनाचें ही एक दुकान आहे आणि तेथें व्यवस्था नसली ह्मणजे तसा सर्व घोटाळा होतो. मेकालेनें म्याकिनटाश साहेबा बद्दल लिहिलें आहेकीं चांगला दुकानदार हवा कीं नको माल हवा त्या परीचा चटकन काढून देतो त्या प्रकारानें मनाची स्थिती चांगल्या व्यवस्थेशीर दुकाना प्रमाणें ठेवली पाहिजे. आपण जें जें वाचतों त्यांच्या सत्यासत्यतेवर धोरण राखलें पाहिजे. न्याय कोडतांतील पद्धत लक्ष्यांत आणावी. प्रतिपक्षांच्या साक्षीदारांनें खरें सांगितलें तर त्याला ज्यास्त महत्व देतात. हिंदुस्थानचा इतिहास एलफिनस्टननें लिहिला आहे त्यांत मराठे शहाणे, कर्तबगार होते असें ह्मटलें असेल तर आपल्या बखरी पेक्षां ही त्याला जास्त वजन दिलें पाहिजे. मात्र चांगल्या गुणा बरोबर वाइटा संबधानें उलट वजन देतां येत नाहीं. वर्तमानपत्रें अनेक आहेत, ग्रंथ अनेक आहेत त्यांचें पर्यालोचन एका मनुष्या हातून होण्या सारखें नाहीं. मनुष्याचें वय, त्याची शक्ति, त्याची पोटधंद्याला लागणारी वेळ खेरीज करून फुरसत हीं असतील त्या मानानें हें पर्यालोचन होणार आहे. तेव्हां एखादा लहान विषय हातीं घ्यावा. ठिकठिकाणची माहिती मिळवून तो विषय आपलासा करावा ह्मणजे कांहीं अडचण पडत नाहीं. वेळेच्या व्यवस्थेकडे मोठी दक्षता पाहिजे. नियमितपणानें पंधरा पंधरा मिनिटें दररोज विषयाचें आलोकन झालें तर महिना चार महिन्यांनीं तो विषय अपरिचित राहील असें नाहीं. फार दिवसांनीं कोणी दुसऱ्याच्या भेटीस गेला आणि इंग्रजी रिती प्रमाणें नांवाची कार्ड पाठविलें तरी देखील त्याची ओळख पटत नाहीं. तसें वाचना विषयीं होऊं देऊं नये. मागील पुढील सुत्रें जुळवावीं म्हणजे कालाचा अपव्यय होत नाहीं पण अनियमितपणानें सहा सहा तास सुद्धा वाचन कामा नये.

नियमितपणानें वाचण्याची एकोणिसाव्या शतकांत ज्यास्त अवश्यकता आहे. अनेक शास्त्र व शोध निघाले आहेत तेव्हां एकेल शास्त्र घ्या आणि त्याचा चांगला अभ्यास करा. अनेक लोक एके ठिकाणीं आले ह्मणजे सर्वांच्या निरनिराळें वाचण्याचा प्रत्येकास लाभ होईल आणि पुष्कळ शास्त्रें सगळ्यांना कळतील. अलिकडे नवे शोध लावण्यास दुसऱ्याच्या ज्ञानाचा असा उपयोग घेतात. येणें करून स्वतांचा फायदा होऊन त्या बरोबर परस्परांचा फायदा होतो.

आपण आतां घरच्या मनुष्यासाठीं काय केलें पाहिजे हा दुसरा प्रश्न होय. घरच्या मनुष्यामध्यें प्रधान बायको आणि नंतर मुलें होत. घरच्या सुधारणे संबधानें मतभेद असेल. मी पुढें जाईन तितके आपण मजबरोबर येणार नाहीं. माझें ह्मणणें रुचेल अगर पचणार नाहीं. तरी मुख्य गोष्टी संबधानें कांहीं फरक नाहीं. बायको संबधानें आपलीं कर्तव्य कर्में कोणतीं? बायको सहधर्मचारिणी ह्मणजे आपल्या बरोबरीची आहे. संस्कृत एका कवीनें तिला प्रधान ह्मणून ह्मटलें आहे. तेव्हां व्यवहारात तिचा विचार घेण्यासाठीं सर्व गोष्टी तिला सांगितल्या पाहिजेत. सर्व तिला समजाऊन दिल्या तर संसारांत पुष्कळ अडचळे येणार नाहींत. हल्लीं प्रमाणें तिच्यावर साम्राज्य चालविणें चांगलें नाहीं. केवळ 'बस्स' ह्मटलें ह्मणजे तिनें मुकाट्यानें ऐकून घ्यावें हें ठीक नाहीं. खरोखर मनःपूर्वक व आस्थापूर्वक तिला सर्व गोष्टी शिकवा ह्मणजे नित्या प्रमाणें भांडणें होणार नाहींत. बायका बरोबरीच्या नाहींत त्यांस ज्ञान व शहाणपणा

नाहीं असें ह्मणूं नका त्यांस सज्ञान करा, शहाणपणा शिकवा. त्यांच्या व पुरुषांच्या जन्माच्या गांठीं तुह्मी शहाणे आहां एवढें पुरें नाहीं. दोन भांड्यामध्यें पाणी असून एकांतील फार उंचीवर असलें आणि दुसऱ्यांतील फार खालीं असलें तर त्या दोन्ही भांड्यांतील पाणी समपातळीवर आणण्यासाठीं मध्यें कोठें तरी अक्षय्यीं नळी लावली पाहिजे त्या प्रमाणें तुह्मी फार चांगलें शिकलेले असला आणि बायका अनुद्बुद्ध अज्ञान असल्या तर उभयता मधील पाणी एका उंचीचें करण्यासाठीं मध्यें एक नळी सारखी खेळविली पाहिजे. बायका बरोबरीच्या असल्या ह्मणजे तंटे बखेडे खचित होत नाहींत. हा माझा स्वानुभव आहे. दुसऱ्यांचा अनुभव ही असाच आहे तेव्हां मी ही अनुभवाची गोष्ट सांगतो. त्या फार शीघ्रग्राही आहेत. त्यांची तुमच्या ठायीं पूज्यबुद्धि असते. तेव्हां तुह्मी खटपट केल्यास कल्पनेच्या बाहेर फायदे होतील अशी पूर्ण खातरी आहे.

आतां मुलांच्या संबंधानें. विवाहा पासून मुलें होतात त्या बद्दल एक संस्कृत कवी ह्मणतो कीं शंभर मूर्ख पोरें नकोत पण शहाणा एकच बरा एक चंद्र बरा. पण हजारों तारका नकोत. मुला संबंधानें आपण आपलें काम केलें नाहीं तर तीं झाल्या पेक्षां नसलेलीं पुरवलीं. बारा मुलें झालीं ह्मणजे कांहीं कृतकार्य होत नाहीं. बारा मुलांचें काम बरोबर होणार नाहीं, त्यांचें पोषण, अन्नवस्त्र व इतर व्यवस्था होणार नाहीं. तर बारा पेक्षां थोडीं मुलें असणें बरें हें विसरता कामा नये. बारा पोरें अनाथ पडलीं तर त्यांच्या वडिलास कोणी शहाणा ह्मणणार नाहीं पण मुलांच्या संबंधानें व्यवस्था कोणती? पूर्वीं पुरुष जितके निपजतील तितकी त्या कुटुंबांची श्री व संपती मोठी होती. पूर्वीं अशा बहु पुरुषांच्या मातेस वीरपत्नी असें ह्मणत. परंतु हल्लीं पूर्वीं प्रमाणें बाहुबळ नको. बाहुबळा ऐवजीं बुद्धिबळ तीक्ष्णण केलें पाहिजे. शिक्षण महाग होत चाललें आहे. मुलांना जितकें लवकर ज्ञान देतां येईल तितकें दिलें पाहिजे. आठ दहा वर्षांपर्यंत मुलें आपणा जवळ असतात. हल्लींच्या समाजांतले बाप शिकलेले आहेत आणि मुलांची त्यांच्या ठायीं पूज्यबुद्धि असते तर इतर कुठां तले गुरुप्रमाणें ते न्यायी आणि ममताळू असले तर मुलांचें गृहशिक्षण शाला गृहापेक्षां शंभर पटीनें चांगलें होईल. विलायतच्या आणि आपल्या मुलामध्यें हेंच अंतर आहे. विलायतेस मुलांनां घरीं आपोआप चांगलें शिक्षण मिळतें. विलायतच्या लोकांशीं आपणांस बरोबरी करणें आहे, त्यांच्याशीं संघट्टन झालें आहे तेव्हां त्यांचा मुलांस शिकविण्याचा प्रकार उचलला पाहिजे फार खर्चाच्या त्यांच्या शिक्षण पद्धती बाजूस टाकल्या तरी ही अल्पमोलाची सूचना आपण स्वीकारली पाहिजे. मुलांस घरीं फुरसतींत शिकविलें ह्मणजे त्यांत सर्व अंतर्गत होईल. बाप विद्वान असेल, त्याची योग्यता असेल त्या मानानें गृहशिक्षणाचें फळ मिळेल.

दुसऱ्या संबंधानें आपण काय केलें पाहिजे? स्वतां संबंधानें व घरच्या मंडळी संबंधानें जें करावयाचें तें करून मग हें करावं ठसा त्यांच्या ऱ्या गोष्टी करून नंतर ही ध्याव

च्या उलट करणें मला पसंत नाहीं दुसऱ्याच्या कारणीं पडावयाचे म्हणजे अमूक अमूक केलें पाहिजे असें सांगतां येणार नाहीं तरी त्या संबंधानें दिशा दाखविली म्हणजे बस्स आहे. शाळेंतून निघाल्या नंतर सुधारणा कशी काय करावी या विचाराला लागण्या पूर्वीं आपण त्या एका बाजूलाच पाहिजे, आपण एका बळांतील, एका पक्षांतील, एका पटांतील वीर असले पाहिजे. पुर्वसंस्थांशी अनुसरून हल्लींची स्थिति बदलली पाहिजे. मग त्याला सुधीरणा म्हणा किंवा दुर्धारणा म्हणा तत्वमसोशी गांठ ठेवावी. चालतांना कांटा रोऊं लागला तर तो काढून चांगल्या व्यवस्थेनें चाललें पाहिजे. जर कोणी लहानपणचें आंगडें थोरपणीं घालूं म्हणेल तर तें फाटेल किंवा दणगट असलें तर घालतांना चमडें घेईल. खरोखर तें आंगडें लहान आहे किंवा नाहीं हें ज्याचें त्यांस सहजीं कळेल. तद्वत आपल्या पूर्वसंस्था कितपत सध्याला चलाऊ आहेत हें प्रत्येकानें प्रांजळ मनानें पाहावें आणि त्या बेतानें पूर्वसंस्थांत फरक केला पाहिजे. बेजहाट साहेब हिंदुसमाजा विषयीं लिहितो कीं दहा हजार वर्षां पूर्वीं हिंदुसमाज होता तसाच आहे. त्यानें तसें लिहिलें म्हणून मला नवल वाटलें. फरक होत आहेत. फक्त फरकाचें प्रमाण असावें तितकें नाहीं. हिमालय पर्वता वरील बर्फाच्या राशी स्थिर व अचल दिसतात तशा त्या खरोखर स्थिर व अचल नसतात. आठवड्यानें, महिन्यानें आणि वर्षानें त्यांची गती दिसून पडते. पूर्वस्थितींत फरक होण्याचें प्रमाण लहान मोठें आहे. पण पूर्वस्थिती कांहीं कायम ठेवतां येणार नाहीं. फरक होतच आहे. तो फरक किती झाला पाहिजे हें तुम्ही ठरवा. फरक करण्यास इच्छिणारे तुम्हीं सर्व असाल असें मी इच्छितों. आतां दुसऱ्यांस शिक्षण देण्यासाठीं आपण काय काय करावें हें मी व्यक्त करून सांगतों. शाळाखात्याचा अधिकारी, जास्त अनुभवाचा व हृद्याचा या नात्यानें सांगण्याचा विशेष अधिकार आहे. हायस्कुलाचे आपण ऋणी आहां. सरकारच्या म्हणजे लोकांच्या पैशानें हायस्कुलें चालविलीं आहेत. तेव्हां आपल्या लाभाबद्दल आपण ऋणाची फेड केली पाहिजे. मातेचे उपकार फिटले पाहिजेत. मातृगपावर्जन झालें पाहिजे. आपण अशा गोष्टी केल्या पाहिजेत आणि त्या आपण केल्या नाहींत तर मी त्याबद्दल आपणांस दोष देईन. या गोष्टी येणें प्रमाणें:—

( १ ) आपण ज्या गांवीं असाल त्या गांवच्या लायब्ररीचे वर्गणीदार असलें पाहिजेच. त्याबद्दल आर्दी चर्चा नको. आणि फायद्याबद्दल विचार करणें नको. ही गोष्ट निर्विवाद असून सिद्ध आहे.

( २ ) लायब्ररीचे वर्गणीदार झाल्या नंतर तिच्या हिताहिताकडे लक्ष दिलें पाहिजे.

( ३ ) शाळांना हस्तें परहस्तें मदत केली पाहिजे. पैशाची मदत प्रत्येकानें यथा शक्ति द्यावी परंतु तुमचा काळ आणि श्रम यावर आमचे हक्क आहेत. ते तुम्ही शाळेच्या कामकाजा लावले पाहिजेत.

( ४ ) लेखणीचे जे कलमबहादर आहेत त्यांनीं निबंध लिहावेत, व्याख्यानें द्यावीं, आणि जर शिक्षण महाग होत आहे तर तें निराळ्या रितीनें आपण सवंग केलें पाहिजे. मुंबईच्या ग्रंथोत्तेजक मंडळी सारख्या मंडळीस पांच रुपयापासून ही मदत केली तर फार तें वाटतां शिक्षणाच्या उपयोगीं आपणाला सांगावयाचें कीं

आपणाला युद्ध करावयाचें आहे त्याला पूर्वींची भालाबर्चीं नको तरी पूर्वींचा उत्साह, मागील उत्साहशक्ति, तें धैर्य, तो जूट, तो जोम आपल्या आंगीं पाहिजे आहे. आपल्यास युद्ध अज्ञान मूर्खपणा व दुराग्रह यांज बरोबर करणें आहे. तेव्हां अज्ञान मुर्खपणा व दुराग्रह हीं निवडून काढलीं पाहिजेत. देशाभिमानानें आणि धर्माभिमानानें युद्ध करणें आहे. अरी निराळे आहेत हत्यारें निराळीं आहेत. तरी पूर्वींचा तो उत्साह, जूट, धैर्य, शक्ति, आणि जोम असल्या शिवाय चालणार नाहीं. या गोष्टी मनापासून व मनामध्यें पक्या बिंबवून कराल तर तुह्मास यश मिळेल आणि चारचौघां साठीं ह्मणून उगीच वरील सामुग्री शिवाय या गोष्टी कराल तर तुमच्या हातून कांहीं एक होणार नाहीं.

---

# The Berar Samachar

MONDAY, MARCH 21, 1892

In the present sessions at Akola there was one important case in which the accused were the Police Inspector, the Chief Constable and some 3 constables of the Bassim District. The main accused were Messrs Sayana and Abdul Latiff & one constable & the rest were abettors of the crime with which the first werecharged. A person was in the custody of the police for theft. In order to extort confession probably from the deliquent he was maltreated by the Police and the hard and inhuman treatment to which he was subjected culminated in the ultimate death of the victim. There is an alternate version current in the popular rumours. The report says that either he died on account of the rude, antique, devilish cruelties of the Police or that he committed suicide to escape the penalties of the law. Whatever may be the true facts lurking in the deep mysteries of police inquiries one thing is certain that there was a horrible scene in regard to the death of the person. We cannot wholly dislodge the faithful and unanimous reports of their connected and reliable story that runs throughout. To our plain mind the case does not seem as a cooked one. It savours much of reality. The main weakness of the prosecution was that it was not well conducted. We do not in the least intend to throw any reflection on the persons connected with the prosecution. We know that the work with which they were intrusted was rather outside the daily routine and accustomed sphere of usual work. The second fact that struck our mind was that the villagers that stood in the witness-box—some for the first time in their life-were puzzled with the majestic awe of the sessions-Court and were at a loss to say yes or no to the rambling and intricate questions of pleaders of thorough and sound legal acumen. Some of the witnesses were vague inconsistent and inaccurate in their statements. They made the case worse and worse. There were some two witnesses that spoke, it appears, the truth and nothing but the truth. But they lost their weight and influence in the jumbling sense and nonsense of the host of other witnesses.

The third point that missed the close attention of the prosecution was that the conductors of the case did not give a fair & reasonable chance to the witnesses of correcting, limiting, and explaining their unhappy mistakes in the cross-examination. The probable and natural result is that the case utterly broke down. And lastly we take this opportunity along with many others we seized with equal earnestness, to beg our benign Government which is so reputed for its sense of justice for a public prosecutor of merit, intelligence and ability enough to vie with pleaders--the ornament of the Berar bar.

We cannot do justice to our position as the representatives of the feelings of the public without requesting our popular and distinguished Judicial Commissioner to order the case to be retried under Section 417 of the Criminal Procedure at the instance of the Deputy Commissioner of Bassim. But this is simply a request and we would not like to further meddle with the affairs of a distinct officer feasibly appointed with the only object of guarding the institutions of justice. If public opinion were thus immoderately shaken and perturbed what security, in so far as opinion is security, can any Government have?

---

## वऱ्हाड.

मि. टी. सी. क्लौडन आफि० रेसिडेंट हे कायमचे रेसिडेंट झाल्याची आनंदकारक बातमी आली आहे.

मि० बाळकृष्ण लक्ष्मण बापट हे अजारी असल्यामुळें मि० गोपाळ रामचंद्र पिटके यांस अॅक्टिंग डे० इनस्पे० उमरावती नेमलें. आणि मि० केशव ब्रह्मगिरी पाळेकर डे० इनस्पेक्टर इलिचपूर यांच्या चार महिन्याच्या रजेंत मि० बळवंतराव वैद्य यांस धाडलें आहे.

वाशीमच्या फौजदारी खटल्यांतील आरोपी मेसर्स सायन्ना, अब्दूल लतिफ, व तीन कानस्टेबल हे सेशनांत दोषमुक्त ठरले. त्यांची दोषमुक्तता पाहून लोक नवल करितात. प्रासिक्युशन तर्फे खटला चांगला चालला नाहीं. आमच्या मतें वाशीमचे डेपुटी कमिशनर या निकालावर हायकोर्टाकडे अपिल करितील आणि सरकारच्या पक्षाला निष्णात बारिस्टर किंवा अन्य कायदेपंडित देतील तर न्यायदरबारची थोरवी लोकांस कळून येईल.

आनंदाची सुवार्ता कळते कीं निजाम सरकारास द्वितीय पुत्ररत्न झालें आहे.

---

नोटीस

चरंजीव विठोबा पिता सुताराचा मुलगा राहणार आकोली ज्याहागिर तालुके अकोट यास खाली सही करणार याजकडून नोटीस देऊन कळवितो कीं तुम्ही आमचे ज्यामात आहा व तुम्हांस येक मुलगा आहे. व हे दोघे आज सुमारें ९ वर्षें मजपाशी आहेत व यांच्या अन्नवस्त्राचा आज पावेतो तुम्हीं तजवीज केली नाहीं आज पावेतो मी कर्ज काढुन रुपये २५२ खर्च केले आता या उभयतांचा खर्च माझे हातून चालत नाहीं. तर तुम्ही आपल्या बायकोस व मुलास नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत सदहू रुपये २५२ देऊन घेऊन जाणें. असें केले नाहीं-तर अन्न वस्त्रा बदल. व रुपये २५२ फिरयाद करून व अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान होईल तें भरून द्या नोटीसिच्या खर्चा सुद्धा घेऊं मुलगा लग्नास जाहाला आहे व त्यास सांगून सोयरीकी आल्या आहेत. तर कार्याबद्दलचा ही निकाल आठ दिवसांतच करावा. नाहीं जाहल्यास आम्हीं तुमचें नांवावर कर्ज काढून कार्य करू. व हे ही सर्व खर्चा सुद्धा तुमचें पासून घेतले जातील म्हणून दिली नोटीस सही तारीख १८ मार्च सन १८९२ इ० ( सही )

सहीची निशाणी वासला विठोबा वल्लद भगवान सुतार राहणार उगवे याच्या हातची असे.

---

## वर्तमानसार.

annum in advance 5 Postage 13



शास्त्रीय प्रयोगा विषयीं प्रसिद्ध अशा एका गहस्थानें एक बंदुकीच्या गोळीनेंही न फुटणारा चष्मा शोधून काढिला आहे.

हिरात येथें अतिशय पटकीचा उपद्रव चालूं झाला आहे असें समजतें.

हाउस् आफ् लॉर्डस् मध्यें इंडियन आफिसरांचें बिल पसार झालें. सु० प०

मवारवाला नागोरी, सिंघी साहेब मिया व जामगंड हे काठेवाडांतील दंगेखोरांचे मुख्य असून त्या प्रत्येकास पकडण्याबद्दल प्रत्येकीं २००० रुपये प्रमाणें इनाम देण्याचे जाहिरनामे लागले आहे. हल्लीं ते राजकोटाकडे आहेत असें सांगतात.

निजाम व जकब यांच्या दरम्यानचा हिस्याचा खटला आपसांत मिटला असें सांगतात.

गेल्या मंगळवारीं मुंबईस कायदेसभा करून सक्तीनें देवी काढण्याचा कायदा पास झाला.

कलकत्ता व मुंबई यांच्या दरम्यान विमानानें प्रवास करण्याचा एक अमेरिकन माणूस उद्योग करीत आहे.

उत्तर हिंदुस्थानांत आतां पाऊस पडत आहे व त्यामुळें थंडी मोठ्या जोरानें सुरूं झाली आहे. मागचा वनपा आतां काढीत आहे व यावरून सगळेंच उलट दिसतें.

अलीपूर कोर्टांत वकिलीचें काम चांगलें चालत नाहीं ह्मणून तेथील एका वकिलानें वकिलीचें काम काम सोडून कालीघाट येथें भुसाऱ्याचें दुकान घातलें आहे. हा कलकत्ता युनिवर्सिटीचा बी. एल. पास झालेला आहे!

कलकत्त्यास एक गिरणी जळाली व तांदुळांच्या बाजारास आग लागून अजून जळत आहे व आणखी कांहीं दिवस जळतच राहील असें सांगतात.

बंगलोरच्या कोर्टांत नुकतीच एक गमतीची गोष्ट झाली. एक माजिस्ट्रेट महाराजांस सामोरें जाण्या करितां स्टेशनावर गेला होता ह्मणून रोजच्या वेळेस कोर्टांत आला नाहीं. कज्याचे लोक व वकील कोर्टांत हजर होऊन बसले होते. इतक्यांत एक डोकें फिरलेला ब्राह्मण आला आणि वकिलांशीं कज्यांच्या संबंधानें कांहीं विचारपूस करूं लागला. बोलतां बोलतां पटकन माजिस्ट्रेटाच्या आसनावर जाऊन बसला व कज्यांची सुनवणी करून निकाल करण्यास मी तयार आहे असें वकील वगैरेस ह्मणाला! शेवटीं शिपायास हाक मारून व्यवस्था करावी लागली.

दुष्काळाचा परिणाम रेलवेवरही होणार असें दिसतें. असें सांगतात कीं, अलनावर येथील पाण्याच्या साठ्यांतून रेलवेस पाणी पुरविण्या करितां दररोज १४,००० ग्यालन पाणी हुबळी येथें नेण्यांत येतें. त्यामुळें साठ्यांतून आणखीं १,००,००० ग्यालन पाणी निघेल व तें सुमारें एक आठवडाभर पुरेल. अशा रीतीनें पाण्याचा तो साठा खपल्यावर मग हुबळी येथें आगगाडीस लागणाऱ्या पाण्याचा पुरवठा करण्या करितां फक्त पाणी आणण्यासाठीं ह्मणून दररोज एक स्पेशल ट्रेन हुबळीहून ४२ मैलांवर हरीहर फाट्यावरच्या करजगी स्टेशनावर जावी लागेल व तेथून वारदा नदीचें पाणी भरून ... ठा. अ.

✓ एका वजनदार व अनुभविक इंग्रजानें हिंदुस्थानच्या दारिद्र्याचे परिणाम किती भयंकर होणार आहेत या विषयींचे आपले विचार नुकेच एके ठिकाणीं नमूद केलेले आमच्या पाहण्यांत आले. ते प्रत्यकानें लक्षांत घेण्यासारखे आहेत.

"लोकहो, तुह्मांपैकी पुष्कळजण सरकारासारखेच आंधळे दिसतात. तुह्मामध्यें जे श्रीमान आणि खाऊन पिऊन सुखी आहे, त्यांच्या लक्षांत सुद्धा येत नाहीं कीं, हल्लीची राज्यपद्धति देशाच्या गरजा भागविण्याला सोईवार नाहीं एवढेंच नव्हे. लोकांना कंगाल करीत आहे एवढेंच नव्हे. या गोष्टी तुह्मां सर्वांस माहीत आहेत आणि त्यांचे तुह्मांला मनापासून वाईटही वाटत आहे. जगाच्या इतिहासांत जे अत्यंत भयंकर प्रळय झाले आहेत त्यांसारखाच आणखी एक प्रळय घडवून आणण्याची ही राज्यपद्धति तयारी करीत आहे.

"हिंदुस्थानचे लोक फार सहनशील, फार सौम्य, आणि फार नम्र आहेत. पण जेव्हां फ्रांस देशच्या लोकांनीं बंड करून आपल्या राज्याला ठार मारलें आणि बहुतेक वरिष्ट दर्ज्याचे लोक नाहींसे केले, त्याच्या पूर्वीं वीसच वर्षें, किंबहुना दहाच वर्षें ते लोकही असेच सहनशील, सौम्य आणि नम्र होते. जसे हिंदुस्थानचे लोक फार अज्ञान आहेत व त्यांना काय करावें हें समजत नाहीं व वाट दाखविण्यासही कोणी नाहीं, तसेच फ्रान्स देशचेही होते. पुष्कळ दिवसपर्यंत भूकेनें आणि विपत्तीनें ते लोक गांजल्यामुळें हळूं हळूं व कोणाच्या लक्षांत न येई अशा रितीनें त्यांच्यांत फरक पडूं लागला होता. आणि अखेरीस प्रसंग आला तेव्हां जण काय एकाच दिवसांत तो मेंढ्यांचा कळप लांडग्यांची टोळी बनला.

"सर्व इतिहासांवरून दिसून येतें कीं समाज कितीही शांतताप्रिय असो, उपासमार, अन्याय आणि निराशा यांच्या योगानें तो नवीन स्वरूप धारण करितो आणि दंगेधोपे व गुन्हे करूं लागतो.

"हिंदुस्थानच्या कोट्यावधी लोकांचे स्थितीविषयीं तुह्मांपैकी ज्यांनीं खोल विचार केला आहे ते जाणूनच आहेत कीं, आतां विपत्तीचा वडा अगदीं भरत आला आहे व बेबंदशाईची माता जी दरिद्रता ती दिवसेंदिवस अधिक अधिक लोकांच्या डोक्यावर जोरानें हात ठेवीत आहे.

"दिवस मावळला कीं रात्र येणारच, तद्वत् हल्लींच्या स्थितींत पुढें मोठें भयंकर बंडावा झालाच पाहिजे तो जर नको असेल तर हल्लींची शोचनीय स्थिति सुधारली पाहिजे आणि आपल्या भिकाऱ्यांचीं मुख्य मुख्य दुःखें दूर केलीं पाहिजेत.

"पोकळ आसन फुगूं नका. परमेश्वर दया करून प्रळय लांबणीवर टाकील पण प्रळय हा होणारच आणि झालाच पाहिजे व तो अंमळ लौकर होईल पण उशीरानें होणार नाहीं.

"सरकार स्वतःचे किंवा तुमचे संरक्षण करण्यास समर्थ होईल अशी कल्पना देखील करूं नका. हिंदुस्थानसारख्या देशांत चहोंकडून शेतकरी उठल्यावर त्यांचा मोड करण्यासारखा या जगांत कोणाचे अंगीं शक्ति नाहीं. वाळवंटांत लूक सुटली असतांना वाटसरू जसें आश्रा मिळावा ह्मणून व्यर्थ धावपळ करतात तद्वत् इंग्रजी लोक करतील. सामना होऊन लढाई करण्याला कोणीही शत्रू उभा राहणार नाहीं; पण आगगाड्या आणि पायवाटा बंद पडतील, पूल मोडले जातील, तारायंत्रें नाहींशीं होतील आणि सरकारी सैन्याची अन्नसामुग्री हिसकावून घेतली जाईल. हजारों बंडवाले मारले जातील, पण उपयोग काय? कारण लक्षावधि लोकांना मृत्यूशिवाय गत्यंतरच नाहीं अशी स्थिति होईल व सूड घेण्याशिवाय दुसरा आशांतंतूच राहणार नाहीं. पुढारी तर हवे तितके मिळतील कारण, वेळ आली कीं माणसें निपजतात.

मे. व्हेनिंग साहेब नागपूर विभागाचे कमिशनर हे चांद्यास एका खुनी मनुष्याची चौकशी करीत असतां त्या खुनी मनुष्यानें तेथेंच पडलेली कुऱ्हाड घेऊन तिचा प्रकार मि० व्हेनिंग यांच्या माथ्यावर केला. तो दैवयोगें लागला तसा नाहीं ह्मणून ठीक झालें नाहीं तर तो प्रसंग मोठाच भयंकर होता!

दुष्काळांतल्या भाकरी रशियन सरकाराकडून दुष्काळपीडित प्रदेशांतल्या लोकांस ज्या भाकरी पुरविण्यांत येतात त्यांतील भाकरींचें पृथक्करण करून, विलातेस प्रसिद्ध होणाऱ्या "ल्यान्सेट" नांवाच्या एका वैद्यकीय पत्रानें असें कळविलें आहे कीं, या भाकरींत शेंकडा १० भाग व १० भागांपेक्षांही अधिक लांकडाचा भुस्सा, तंतुमय पदार्थ, पानांचा चुरा, आणि गारेची व वाळूची बुकणी असते. ही भाकरी उदी रंगाची व घाणेडी दिसते. पुष्कळ लोकांना ही भाकरी आहे असें तिच्या रंगावरून ओळखूंही येत नाहीं!

क० त०

---

नोटीस.

नागोराव देर्पांजी देशमुख राहणार कवठळ तालुके मंगरूळपीर जिल्हे वाशीम यांस—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुम्हास माझे तर्फे कोर्टांत काम चालविणें करितां पांच रुपयाचे स्टांपावर कुलमुखत्यारपत्र दिलें होतें. त्याप्रमाणें तुमचे कडून माझें कामाबद्दल कांहीं एक तजवीज झाली नाहीं, व पुढें ही कांहीं होणार नाहीं. अशी माझी पक्की खात्री झाल्यावरून तुमचें मुखत्यारपत्र आज तारखे पासून रद्द केलें आहे. यापुढें तुम्ही कांहीं खटला कोर्टांत चालविल्यास कोणतेही प्रकारें तुमची तक्रार ऐकली जाणार नाहीं व तुह्मांस मुखत्यारपत्र परत मागितलें असतां दिलें नाहीं. सबब ह्या नोटीशीनें जाहीर केलें आहे. तर नोटीस पावले पासून आठ दिवसांचे आंत मुखत्यारपत्र परत द्यावें. कळावें तारीख ३ माहे मार्च सन १८९२ इ०

(सही.)

रामजी वलद श्रीकृष्ण कळवात रहाणार कवठळ ता मंगरूळ जिल्हा वाशीम

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो ते...

वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावे ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि० क्लास १५ मिसल नंबर १/१८९२

स्पे० अ० कमिशनर साहेब जि० अकोलें यांचे कोर्टांत.

नांव इंदरचंद बापाचें नांव सालमचंद राहणार वरूड प्रगणें वडनेर तालुके अकोट जिल्हा अकोला यांस मयतः—

सिवलाल बापाचें नांव भिकमचंद मारवाडी राहणार. वरूड प्रगणें वडनेर तालुके अकोट जिल्हा अकोला याचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहु मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणुन ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहीरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणीं तारीख २ माहे एप्रील सन १८९२ इसवी रोजी सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपलें हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ९ माहे मार्च सन १८९२ इ०

V. N. DANDEKAR.

शिक्का सिव्हील ज्यडज्य.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १५ मिसल नंबर ३/१८९२

स्पे० अ० कमिशनर साहेब जि० अकोलें यांचे कोर्टांत.

नांव काळो कृष्ण सहस्त्रबुद्धे अ० पा० करणार मातोश्री सत्यभामाबाई भ्रतार कृष्णाजी दिनकर रहाणार अकोला तालुके अकोला जिल्हा अकोला यांस मयतः—

कृष्णाजी बापाचें नांव दिनकर रहाणार अकोला तालुके अकोला जिल्हा अकोला यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता० २ माहे एप्रील सन १८९२ इ० रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल. त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १० माहे मार्च सन १८९२ इ०

V. N. DANDEKAR

शिक्का सिव्हील ज्यडज्य.

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" खान्यांत नारायण खंडेराव फडके प्रसिद्ध केलें.